आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

March 2021, Issue-74, Vol-01

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) National Education Policy 2020 : A Comparison with the National Policy ...
Dr. Sushil Kumar, Sangli (M.S.) ||84

15) Sex Workers and Their Human Rights
Vani Vyas, Jaipur ||89

16) जलसंवर्धनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान
प्रा. डॉ. अरूण बावा, जि. उस्मानाबाद ||99

17) बदलती शिक्षण पद्धत
श्री. बाळासाहेब रघुनाथ चव्हाण, जिल्हा— पालघर ||101

18) भूमि उपयोगाचे वर्गीकरण, पीकरचना आणि पीक रचनेतील बदल
डॉ. ढास डी.के., जि. बीड ||106

19) भारतीय संघराज्य आणि मर्यादा
प्रा. डॉ. सायबण्णा घोडके, जि. उस्मानाबाद ||109

20) विशेष आर्थिक क्षेत्र : विविध घटकावरील परिणाम व उपाययोजना
डॉ.संजयकुमार एम. कांबळे, जि.जालना ||112

21) भारतीय अर्थव्यवस्था : रोजगार संधी
डॉ. एन. के. मुळे, जिल्हा बीड ||114

22) साहित्य,समाज आणि संस्कृती यांच्यातील अनुबंधाचे दर्शन—'नाद अंतरीचा ...
डॉ.नावडकर विद्या .विजय, जि.रायगड (नवी मुंबई) ||118

23) बौध्द स्थळांचे धार्मिक परिवर्तन भारतीय पर्यटनातील संभ्रम: एक अभ्यास
डॉ. सुनिलचंद्र सोनकांबळे, जि.नांदेड ||124

24) देश के सरदार :सरदार पटेल
कुलदीप सिंह & डॉ० सुधा गुप्ता, जनपद जालौन ||129

25) भारत में ऑनलाइन शिक्षा का प्रभाव
डॉ. रेणु आशीष तिवारी, कामठी ||133

26) दादा भाई नौरोजी का आर्थिक चिंतन (धन निष्कासन के विशेष संदर्भ में)
डॉ. अभय कुमार सिंह, छपरा, बिहार ||137

27) कृष्णा अग्निहोत्री का व्यक्तित्व और कृतित्व
अपसाना खान & डॉ. रेशमा अंसारी, रायपुर (छ.ग.) ||142

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.891(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | March 2021 Issue-74, Vol-01 | 0114

करून तेथे पायाभुत सुविधा निर्माण कराव्यात.

3- SEZ साठी निवड करण्यात येणारी जमीन पडीत/नापीक असावी.

४. ज्या शेतकऱ्याच्या जमीनी SEZ मध्ये गेलेल्या असतील त्यांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र राष्ट्रीय पुनर्वसन धोरण ठरवावे.

५. सध्या SEZ मध्ये २५% प्रदेशात औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे बंधनकारक आहे. मात्र हे क्षेत्र ५०% करावे.

6- SEZ क्षेत्रात कामगारहिताचे काळजी घेण्याच्या दृष्टीकोनातुन SEZ च्या कामगार कायद्यात अनुरूप बदल व्हावेत. त्या अनुषंगाने कामगारांना त्यांचे लोकशाही हक्क प्राप्त होतील.

7- SEZ क्षेत्राात वित्त संस्था व बँकांना व्यवहारासाठी मान्यता देण्यात आली आहे. परंतु त्यांच्याकडुन कोणत्याही गैर व्यवहारांना चालना मिळणार नाही. याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

थोडक्यात जागतिकीकरण,विशेष आर्थिक क्षेत्रे या माध्यमातुन भारतीय शेती व्यवसाय,शेतकरी,शेतीमजुर संकटाच्या विळख्यात सापडला आहे. प्रसिध्द उद्योगपती नारायणमुर्ती सतत म्हणतात की, 'सकारात्मक विचार करा म्हणजे प्रगती होते'' परंतु या विस्थापीत वर्गाने कितीही सकारात्मक केवळ विचार करून त्यांचे प्रश्न सुटणे अशक्य आहे. त्यासाठी शासन, उद्योजगत, समाजकार्य करणारे नेतृत्व यां सर्वांनीच एकत्र येउन चिंतन करून कृती कार्यकमाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. केवळ आर्थिक विकास म्हणजे जगातील श्रीमंतांच्या यादीत भारतीय उद्योजक चमकले म्हणजेच विकास झपाटयाने झाला असे म्हणने उचित ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. मधुसुदन साठे,एसईझेड चे रणकंदन ? लोकसत्ता अर्थवृतांत,मार्च २००७.

२. दिपक भामरे, विशेष आर्थिक क्षेत्रः समस्या आणि उपाय,अर्थसंवाद एप्रिल—जुन २००७.

३. अर्थसंवाद — मराठी अर्थशास्त्र परिषद,एप्रिल — जुन २००७.

४. लोकराज्य सप्टेंबर २००७.

21

# भारतीय अर्थव्यवस्था : रोजगार संधी

**डॉ. एन. के. मुळे**

सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

सुंदरराव सोळंके कला, वाणिज्य , विज्ञान महाविद्यालय,

माजलगांव, जिल्हा बीड

**********

आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था अशी अभिमान वाटावी अशी भारताची ओळख निर्माण झालीय. तसेच आपला देश मानव संसाधनाची मोठी खाण आहे. विकसित देशांमध्ये वृध्दांची संख्या वाढत असतांना २०२२ मध्ये जगातील सर्वाधिक तरुणांची संख्या भारतात असणार आहे. भारतातील संख्या भारतात असणार आहे. भारतातील एकुण लोकसंख्येच्या ४० टक्के लोकसंख्या तरुण असणार आहे. भारतातील तरुणांचा वर्ग बहुमूल्य असे मानव संसाधन आहे. आतापर्यंत सर्वच सरकारांचा प्राधान्यक्रम सृजनशील आणि प्रतिभावान तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देणे हाच आहे.

आधुनिक अर्थयवस्थेचे यश आणि अपयश रोजगार निर्मितीवर अवलंबून आहे. देशातील प्रत्येक हाताला काम देणे हे चांगल्या अर्थव्यवस्थेचे लक्षण आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतमध्ये विविध क्षेत्रातील रोजगार खालील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**Indian Economy**

| | Industry | (Percentage) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1983 | 1993-94 | 1999-2000 | 2004-05 |
| 1 | Agriculture | 65.42 | 61.03 | 56.64 | 52.06 |
| 2 | Mining & Quarrying | 0.66 | 0.78 | 0.67 | 0.63 |
| 3 | Manufacturing | 11.27 | 11.10 | 12.13 | 12.90 |
| 4 | Electricity, Gas & Water Supply | 0.34 | 0.41 | 0.34 | 0.35 |
| 5 | Construction | 2.56 | 3.63 | 4.44 | 5.57 |
| 6 | Trade, Hotel and Restaurant | 6.98 | 8.26 | 11.37 | 12.62 |
| 7 | Transport, Storage & Communications | 2.88 | 3.22 | 4.06 | 4.61 |
| 8 | Financial Services | 0.78 | 1.08 | 1.36 | 2.06 |
| 9 | Community, Social & Personal Services | 9.10 | 10.50 | 9.16 | 9.24 |
| | Total Employment | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 |

Source :- Government of India, Ministry of Finance, Economic Survey, २००७-२००८ Table १०.१० p. २४७

**भारतात रोजगार व बेरोजगारीचे मोजमाप (Employment**

Unemployment Measurement In India)

भारतात बेरोजगारीविषयक आकडयांचे तीन प्रमुख स्त्रोत आहेत:

i) दशवार्षिक जनगणनेचे अहवाल:

ii) राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेचे (NSSO) यांकडील एम्प्लॉयमेंट एक्सचेंजकडे झालेल्या नोंदणीची आकडेवारी.

iii) रोजगार व प्रशिक्षण सरसंचलनालय (DGET) यांकडील एम्प्लॉयमेंट एक्सचेंजकडे झालेल्या नोंदणीची आकडेवारी.

यापैकी NSSO चे अहवाल सर्वात महत्वाचे मानले जातात

NSS ची ६६ वी फेरी (६६ th Round of NSS)

NSSO ने जुलै २००९ ते जून २०१० दरम्यान आपली ६६ वी फेरी पूर्ण केल. ही ६६ वी फेरी ८ वी पंचवार्षिक फेरी होती. ही फेरी पुढील विषयांबाबतच्या आकडेवारीबद्दल होती.

i) घरगुती उपभोक्त खर्च, आणि

ii) रोजगार व बेरोजगारी. (यापूर्वी NSSO ने आपल्या ६१ व्या फेरी अन्वये २००४-०५ मध्ये ही आकडेवारी जमा केली होती.)

NSS च्या ६१ व्या फेरीनुसार (२००४-०५) आणि ६६ व्या फेरीनुसार (२००९-१०) देशातील श्रम शक्ती, कार्यशक्ती व बेरोजगारी व्यक्तींची संख्या (आकडे दशलक्षात) पुढीलप्रमाणे होती:

| निर्देशक | २००४-०५ | २००९-१० |
|---|---|---|
| **१) UPSS च्या आधारावर :** | | |
| श्रम शक्ती | ४६९.० | ४६८.८ |
| कार्यशक्ती | ४५७.९ | ४५९.० |
| बेरोजगार | ११.३ | ९.८ |
| बेरोजगारी दर (%) | २.३ | २.० |
| **२) CWS च्या आधारावर :** | | |
| श्रम शक्ती | ४४५.२ | ४५०.४ |
| कार्यशक्ती | ४२५.२ | ४३४.२ |
| बेरोजगार | २०.० | १६.१ |
| बेरोजगारी दर (%) | ४.४ | ३.६ |
| **३) CDS च्या आधारावर :** | | |
| श्रम शक्ती | ४१७.२ | ४२८.८ |
| कार्यशक्ती | ३८२.८ | ४००.८ |
| बेरोजगार | ३४.३ | २८.० |
| बेरोजगारी दर (%) | ८.२ | ६.६ |

२००९-१० मध्ये ग्रामीण व शहरी, तसेच पुरुष व महिलांच्या बेरोजगारीचा दर विविध आधारांवर पुढील प्रमाणे होता:

| बेरोजगारीचा दर (%) | | | | |
|---|---|---|---|---|
| निर्देशक | ग्रामीण | शहरी | पुरुष | महिला |
| UPSS | १.६ | ३.० | २.० | २.३ |
| CWS | ३.३ | ४.२ | ३.३ | ४.३ |
| CDS | ६.८ | ५.८ | ६.१ | ८.२ |

**रोजगार वृध्दीचे खाजगी अनुमान :**

आतपर्यंत रोजगार वृध्दीचे तीन अनुमान उपलब्ध आहेत. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन कंपनी या खाजगी कंपनीकडून मुंबई शेअर बाजाराच्या सहकार्याने, देशभरातले रोजगार विषयक मासिक अनुमान, जानेवारी २०१६ पासून प्रसिध्द करण्यात येत आहे. या आकडेवारीनुसार मे २०१७ ते एप्रिल २०१८ या काळात ३ दशलक्ष रोजगार घटले.

दुसरे अनुमान म्हणजे पुलक घोष (प्रोफेसर, आय आय एम, बंगलोर) आणि सौम्या घोष ( एसबीआय) यांचा जॉईंट पेपर आहे. वेतनपटाशी संबंधित घ्ट्वर्डस पे रोल रिपोर्टिंग ईन इंडियाड या पेपरमध्ये वेतनपटावर आधारित, भारतातील रोजगार बदलाशी संबंधित भारतातले पहिले अनुमान त्यांनी प्रकाशित केले. रोजगारात वाढ झाल्याचे पाहिले अनुमान त्यांनी मार्च २०१८ मध्ये केले, अकृषक ७ दशलक्ष रोजगार निर्माण झाल्याचे अनुमान त्यांनी सांगितले. त्यांच्या नुकत्याच म्हणजे २०१८ च्या जुलै १८ मधल्या अनुमानानुसार . १८ या वित्तीय वर्षात किमान १० दशलक्ष रोजगार निर्माण झाले.

तीसरे अनुमान तीर्था दास आणि सुरजीत एस भल्ला केले असून त्यानुसार १८ या वित्तीय वषारत १२.८ दशलक्ष रोजगार निर्माण झाले. त्यांचे अनुमान व्यापक आकडेवारीवर आधारित आहे. (उदा. वर चर्चा केल्याप्रमाणे, बांधकाम क्षेत्रातली सकल राष्ट्रीय उत्पादन वृध्दी) , ई पी एफ ओ आकडेवारी ( १८-२१ वर्षांच्या व्यक्तींसाठी) २०१४ आणि २०१५ मधले श्रम बळ सर्वेक्षण आणि २०१६ आणि २०१७ मधली बेरोजगारी विषयी सीएमआयइची आकडेवारी.

**बेरोजगारीचा दर -**

NSSO (National Sample Survey Office) रोजगार व बेरोजगारीविषयक माहिती संकलित करुन दर ५ वर्षांनी भारतातील रोजगार बेराजगारीच्या निर्देशफलकाचा अहवाल (Key Indicators of Employment & Unemployment in India) प्रकाशित करत असते. १९७२-७३ ला NSSO ने आपल्या २७ व्या मोजणी फेरीत देशाचा असा पहिला अहवाल प्रकाशित केला NSSO ने २००४-०५ मधील ६१ व्या मोजणी फेरीत सातवा आणि २००९-१० मधील ६६ व्या मोजणी फेरीत आठवा आणि २०११-१२ मधील ६८ व्या मोजणी फेरीत नववाछ अहवाल प्रकाशित केला. या अहवालामध्ये वापरल्या गेलेल्या विविध संकल्पना, व्याख्या आणि

रचना या दांतवाला समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार असतात. NSSO कार्यकारी लोकसंख्या आणि बेरोजगारीत लोकसंख्येचे प्रमाण मोजते. रोजगारीत लोकसंख्या मोजताना नियमित , स्वयं व नैमित्तिक (Casual) रोजगारी मोजले जाते. यात अर्धरोजगारी मोजली जात नाही. NSSO रोजगाराचे व बेरोजगाराचे आकडे ४ प्रकारांत प्रकाशित करते.

### बेरोजगारी (NSSO)

UPS-Usual Principal Status.

| आकडे [कोटी] | २००९-१० | २०११-१२ | |
|---|---|---|---|
| कामकरी | ४३.८९ | ४४.०(३६.४%) | LFPR |
| रोजगारीत | ४२.४१ | ४३.४६(३५.४%) | WPR |
| बेरोजगार | १.१ | १.२४(१%) | PU |
| बेरोजगारीचे प्रमाण | २.५% | २.७% | UR |

USS-Usual Status (ps+ss)

| आकडे [कोटी] | २००९-१० | २०११-१२ | |
|---|---|---|---|
| कामकरी | ४६.८८ | ४८.३७(३९.५%) | LFPR |
| रोजगारीत | ४५.९ | ४७.२९ (३८.६%) | WPR |
| बेरोजगार | ०.९८ | १.०८ (०.९%) | PU |
| बेरोजगारीचे प्रमाण | २.०% | २.२% | UR |

CWS- Current Weekly Status.

| आकडे [कोटी] | २००९-१० | २०११-१२ | |
|---|---|---|---|
| कामकरी | ४५.०४ | ४६.२७(३९.७%) | LFPR |
| रोजगारीत | ४३.४२ | ४४.५६ (३६.०४%) | WPR |
| बेरोजगार | १.६२ | १.७१(१.४%) | PU |
| बेरोजगारीचे प्रमाण | ३.६% | ३.७% | UR |

CDS-Current Daily Status.

| आकडे [कोटी] | २००९-१० | २०११-१२ | |
|---|---|---|---|
| कामकरी | ४२.८९ | ४४.०४(३५.९%) | LFPR |
| रोजगारीत | ४०.०८ | ४१.५७ (३३.९%) | WPR |
| बेरोजगार | २.८१ | २.४७(२%) | PU |
| बेरोजगारीचे प्रमाण | ६.६% | ५.६% | UR |

### रोजगार विस्तार धोरण :-

विद्यमान सरकारने रोजगाराला चालना मिळण्याच्या दिशेने काही सुधारणा हाती घेतल्या आहेत. उदा. रस्ते बांधाणीवर भर (श्रम विषयक काम), मुद्रा योजना. (लहान उध्दोजकांना कर्ज पुरवठयाची सोय) आणि नवे कामगार घेणाऱ्या मालकाला वेतन अनुदान, ( भविष्य निर्वाह निधी साठी मालकाचे योगदान सरकार भरणार)

बांधकाम क्षेत्रातल्या सकल राष्ट्रीय उत्पादन वृध्दीची , वित्तीय वर्ष १८ मधल्या वाढीत मोठी भूमिका आहे. वित्तीय वर्ष २०१८ मध्ये बांधकाम क्षेत्रात सकल राष्ट्रीय उत्पादनात झालेली ५.८ टक्के वृध्दी ही गेल्या सहा वर्षातली सर्वात सर्वात मोठी वाढ आहे. वित्तीय वर्ष १८ मध्ये बांधकामाला मिळालेली गती ही गेल्या २० वर्षात मिळालेली सर्वोच्च होती. २०१८ या वित्तीय वर्षात बांधकाम क्षेत्राने १.७ ते ३ दशलक्ष रोजगार उपलब्ध केल्याचे अनुमान आहे.

### सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र रोजगार निर्मिती. :

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आपल्या देशातील औद्योगिक क्षेत्रातल्या एकूण व्यवहारांमध्ये लक्षणीय योगदान देतात आणि अधिकाधिक रोजगारनिर्मिती करण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावतात. सध्या देशभरात सातकोटीहून अधिक सूक्ष्म , लघु आणि मध्यम उद्योग आहेत. ज्यांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या उद्योगांमध्ये सुमारे बारा कोटी रोजगार निर्माणहोत आहेत. हे असे क्षेत्र आहे की जे कृषीक्षेत्राखालोखाल मोठ्या प्रमाणांवर स्वयंरोजगार आणि नोकऱ्यांच्या विस्तृत संधी निर्माण करते. त्यावरोबरच, या क्षेत्रात कामगार आणि भांडवल यांचे गुणोत्तरदेखील बरेच जास्त असलेले दिसून येते ऐतिहासिकदृष्ट्या, गेल्याकाही काळात घडून आलेल्या विकास प्रक्रियेमुळे लोकांची रुची कृषी आधारित उद्योगाकडून, उत्पादन आणि सेवा क्षेत्रासारख्या बिगर कृषी व्यवसाया कडे वळली आहे. त्यामुळे आता देशाच्या वाढीसाठी, विकासासाठी आणि रोजगार निर्मितीच्या ध्येयपूर्तीसाठी उत्पादन आणि सेवा क्षेत्र निर्णायकरित्या महत्वपूर्ण ठरत आहे. येत्या काही वर्षात , लोकसंख्येत लक्षणीय वाढ होईल आणि त्यातही काम करण्यायोग्य वर्गात अभूतपूर्व वाढ होण्याची अपेक्षा असतांना, या मोठ्या प्रमाणातल्या कामगार वर्गाला सामावून घेण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला महत्वाची भूमिका बजावावी लागेल. या क्षेत्रात रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी, मनुष्यबळरुपी भांडवलाच्या उभारणीवर लक्ष केंद्रित करणे महत्वाचे आहे. खासकरून वाहतूकीशी संबंधित उपकरणे आणि विद्युत यंत्रे, लाकूड, चामडे आणि चामडयापासून तयार होत असलेली इतर उत्पादने, कागद, कापड आणि हस्तकलेच्या वस्तु इत्यादी सारखेकाही विशिष्ट उद्योग, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कामगार वर्गाची आवश्यकता असते अशा उद्योगांसाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे हे महत्वाची गोष्ट आहे.

### कृती कार्यक्रम :

अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कारण या क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील अन्य क्षेत्रांवर अनेक पटींनी प्रभाव पडत असतो. उत्पादन क्षेत्र अर्थव्यवस्थेमधील इतर क्षेत्रांतून उपलब्ध होणारा कच्चा माल आणि सेवा यांचा उपयोग करुन घेते आणि त्या बदल्यात त्या क्षेत्रांना तयार उत्पादने पुरवते. अशा प्रकारे हे क्षेत्र कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनापर्यंतच्या, उत्पादन साखळीमधील सर्व गोष्टींच्या मागणीला चालना देते. राष्ट्रीय उत्पादन धोरणात कल्पिल्याप्रमाणे, उत्पादन क्षेत्रामध्ये सन २०२२ पर्यंत १० कोटी लोकांना रोजगार देण्याची क्षमता आहे. तथापि, तसे करण्यासाठी , काही तातडीचे बदल घडवून आणणे अत्यावश्यक आहे.

### रोजगार वाढीला चालना देण्यासाठी काही उपयुक्त सूचना :

१) कामगार केंद्रित उद्योगांच्या वाढीला प्रोत्साहन देणे.

२) विद्यालये, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये नाविन्यपूर्ण

प्रयोगशाळा उभारुन प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे.

३) उत्कृष्ट गुणवत्तेच्या पध्दतीचा अवलंब करुन कामगारांची उत्पादकता वाढवणे.

४) योग्यवेळी कर्ज पुरवठा होत राहील हे सुनिश्चित करणे आणि.

५) तयार झालेल्या उत्पादनांना चांगली बाजारपेठ उपलब्ध करुन देणे.

आपल्या देशात काही भागात तुलनेने खूप कमी मनुष्यबळ असून काही भागात मनुष्यबळाची उपलब्धता अधिक प्रमाणात आहे. याचे कारण नियोक्ता व नोकरदार यांच्यात योग्य वेळी आवश्यकतेनुसार समन्वय साधणारा दुवा उपलब्ध नाही. नोंदणी न केलेले लेबर कॉन्ट्रॅक्टर जादा असल्यामुळेही या समस्येत भर पडते आहे. वर्तमान शासनाने या समस्येवर काही समाधान मिळवण्यासाठी राष्ट्रीय करियर सेवा संकेतस्थळ तयार केले आहे. तरिही काही प्रश्न जसे उपलब्ध माहितीच्या तुलनेत कामगार व कार्य नियुक्त मनुष्यबळ यांच्या आकडेवारीतील तफावत वाढत जात आहे. तसेच कामात सहभागी होण्याच्या दराबाबत स्त्रियांसह पुरुषांच्या संख्येतही घट होत आहे. शासकिय धोरणाप्रमाणे स्त्रियांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन बांधील आहे. तरिदेखील स्त्रियांच्या बेराजगारीच्या आकडेवारीतील वाढ हा एक गंभीर प्रश्न आहे. याचे प्रमुख कारण अत्यंत कमी वेतन हे आहे. तसेच आपल्या देशात स्वयंनिवडीनुसार रोजगारसंधी मिळत नाहीत. मिळणा-या रोजगारसंधी या वैयक्तिक शिक्षण व परसंतीनुसारच मिळतील याची शाश्वती नाही. तसेच कुशल कामगारांचा अभावामुळे रोजगारसंधी असूनही त्या रिक्त राहतात.

यासाठी वर्तमान सरकारने सुरु केलेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास संस्था National Skill Development Agency (NSDA), राष्ट्रीय कौशल विकास महामंडळ National Skill Development Corporationण

(NSDC), व प्रशिक्षण महासंचालक Directorate General of Training (DGT) यांच्याव्दारे चालवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाच्या विविध उपक्रमातून स्वयंरोजगाराला प्रोत्साहन लाभून रोजगारात भरभराट दिसून येईल, अशी अपेक्षा आहे.

**लोकसंख्या भारतासाठी अनुकुल :**

डेमोग्राफीक डिव्हिडंड आणि लोकसंख्येचा उच्च दर या बाबी आता मागे पडल्या. राष्ट्रीय प्रजनन दर आता. प्रति महिला, २.१ बालक असा तर लोकसंख्या वृध्दी दर केवळा वार्षिक १.१ टक्के असा कमी झाला आहे. दोन दशकांपूर्वी हा दर १.८ होता. १५-२४ या वयोगटातल्या युवांची संख्या. येत्या पाच वर्षात २.५ दशलक्ष ने वाढण्याची अपेक्षा आहे. (२०१७ मधल्या २३६.२ दशलक्ष वरुन २०२२ मध्ये २३८.७ दशलक्ष) युवकांची व्यापक व्याख्या घेतली. (१५-३४ वर्षे) तरी येत्या पाच वर्षात, केवळ ११.७ दशलक्षची वाढ होईल. २०१२ आणि २०१७ मध्ये हा दर जवळजवळ दुप्पट होता.

शैक्षणिक नोंदणीतही मोठी वृध्दी दिसून आली. २००४-०५ आणि २०११-१२ यामधल्या काळात, शाळा अथवा महाविद्यालयात जाणाऱ्यांची संख्या ४० दशलक्षने वाढली. (१५ वर्षापेक्षा कमी वर्ष वयोगट) येत्या सहा वर्षात, शैक्षणिक नोंदणीत वाढ होऊन, २०११-१२ मधल्या १०१ दशलक्ष वरुन ती २०१७ मध्ये ११२ दशलक्ष झाली, असे अनुमान आहे.

भारतात , महिलांचा , श्रम बळ सहभाग दर कमी झाला असून त्याबाबत गैरसमज झाला आहे. जास्तीत जास्त महिला शाळा आणि महाविद्यालयात जात आत. त्यामुळे निम्मी घट दिसत आहे. दुसरं म्हणजे महिलांचा श्रम बळ दर घटत आहे त्याच दराने पुरुषांचा सहभाग दरही घसरत आहे २४ वर्षावरील महिलांचा श्रम बळ सहभाग २००९ पासून स्थिर राहिला आहे. महिलांमधल्या वाढत्या शैक्षणिक प्रमाणामुळे त्यांचा , श्रम सहभाग आणि रोजगार , भविष्यात वाढणार आहे.

**ठळक मुद्दे :**

शासन सर्वांनाच नोकऱ्या देऊ शकत नाही. तसेच प्रत्येकाने नोकरदार होणे हे देखील विकासाच्या दृष्टीने अपेक्षित नाही. आजीवन वेतनाच्या नोकऱ्या उपलब्ध करुन देऊन नियोक्ता नोकरदार अशा दोन वर्गाची विषम आकडेवारी वाढवणे विकासाला पोषक ठरत नाही. त्याऐवजी, रोजगारावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, जे अल्पकालीन आणि करारात्मक असू शकते.

सद्यस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे घडत आहेत. जसे, ग्रामीण भागांचा शहरी भागांत कायापालट. शेतीच्या क्षेत्रांत बिगरशेतीचे उद्योग, निर्वाहासाठी तात्पुरत्या रोजगारांपासून मासिक अथवा दैनिक वेतनाच्या रोजगारांच्या संधी, आजीवन नोकरीऐवजी अल्प कालीन करार तत्वावरील नोकऱ्या , नियोक्ता नोकरीदार पध्दतीच्या नोकरीऐवजी युवा पिढीचा स्वयंउद्योजकतेकडे कल इ.

व्यावसायिकता, स्वयंरोजगार व उद्योजकतेची मानसिकता उद्यमशीलता संस्कृतीतून मानसिकता उद्यमशीलता संस्कृतीतून रुजावी याच उद्देशाने शासनाने स्टर्ट अप इंडिया , स्टॅड अप इंडिया तसेच मुद्रा योजना यांसारखे उपक्रम सुरु केले.

रोजगारसंधींची वाढ आणि विकासाची गती एकसमान किंवा समांतर असेलच असे नाही. विकासाची रचना ज्या स्वरुपाची आहे

त्यावर त्यांचे नवनवीन उद्यम व रोजगारसंधींचे सकारात्मक निकाल अवलंबून असतात.

संदर्भ ग्रंथ सुची :


१. भारतातील बेरोजगारी आणि रोजगाराचा हक्कडॉ. जे. एफ. पाटील., डॉ. व्हि.बी. ककडे, प्रबोधन प्रकाशन इचल करंजी.

१. योजना मासीक. सप्टेंबर २०१८

२. Indian Economy, S.K. Misra, V. K. Puri २६th edition २००८ , Himalaya Phblishning House Mumbai.

३. भारतीय अर्थव्यवस्था, रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन पुणे

४. स्पर्धा परिक्षा अर्थशास्त्र -१ डॉ. किरण जी देसले, दिपस्तंभ प्रकाशन. जळगांव

५. Government of India , Ministry of Finance Economic Summery] २००७-२००८ , Table १०.१०, Page No. २४७

६. NSSO ६८th Survery, Empl Report, Ch ३, Page No. २७


□□□

**22**

# साहित्य,समाज आणि संस्कृती यांच्यातील अनुबंधाचे दर्शन—'नाद अंतरीचा श्रीलंका व कुंपणापलीकडला देश पाकिस्तान'


डॉ.नावडकर विद्या विजय
सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, मराठी विभाग,
वीर वाजेकर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
फुंडे, ता.उरण, जि.रायगड (नवी मुंबई)


**********


गोषवारा —

प्रवासात जे प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले ते ललित लेखनरूपाने मांडणे म्हणजे प्रवासवर्णन, असे ढोबळमानाने म्हणता येईल. सर्वसामान्यपणे वर्णनाची पातळी हकीकतीची किंवा वृत्तांतकथनाची राहते. देश, काल,परिस्थिती ह्यांचे वर्णन, प्रवासातील हालअपेष्टा, मौजमजा वगैरेंच्या हकीकती वस्तुनिष्ठपणे सांगणे, असेच त्यांचे परंपरगत स्वरूप असते. अशी प्रवासवर्णने त्या त्या काळच्या परिस्थितीवर प्रकाश टाकणारी म्हणून अभ्यासाची साधने होऊ शकतात. मराठी वाङ्मयामध्ये प्रवासवर्णनांची एक प्रभावी परंपरा असलेली दिसते. ललितगद्याचा रचनाप्रकार म्हणून प्रवासवर्णनांना महत्त्वाचे स्थान असलेले दिसते.वाङ्मयीनदृष्टीने प्रवासवर्णनांना विशेष स्थान प्राप्त झालेले दिसते. ह्या प्रक्रियेत प्रवास वर्णनकाराच्या संवेदनशील व्यक्तीमत्वाला अपरिहार्य महत्त्व असते. प्रत्यक्ष प्रवासाचा काळ व प्रवास वर्णनलेखनाचा काळ ह्यांच्या दरम्यान कित्येकदा खूप कालावधी लोटलेला असतो. या वेळची प्रक्रिया वेगळ्या पातळीवरची असते. स्थळ, प्रसंग याचा अनुभव दीर्घ काळ मनात रेंगाळलेला असतो. स्मृतीरूपाने तो अनुभव आस्वादला जातो. स्थळ, प्रवासी ह्यांच्यातले दूरत्व नाहीसे होते. स्थळ कसे भावून गेले, ह्याला महत्व येते. स्थळालाही व्यक्तिमत्व असते. प्रवासवर्णनात स्वानुभवाला प्राधान्य असल्याने लेखकाच्या व्यक्तीमत्त्वानुसार निवेदनाची

आधार - भारताचे महानिबंधक

वरील तक्त्यात मराठवाड्यातील सर्व जिल्हातील स्त्रि - पुरुष प्रमाण दर्शविण्यात आलेले आहे. यामध्ये 2001 व 2011 च्या जनगननेनुसार विचार केला तर 2001 मध्ये स्त्रियांचे प्रमाण 2011 पेक्षा जास्त दिसून येत आहे. येथे सर्वात कमी स्त्रि - पुरुष प्रमाण असणारा जिल्हा बीड व जास्त प्रमाण आसणारा जिल्हा परभणी 2011 मध्ये दिसून येतो. म्हणजेच मराठवाडा विभागात स्त्रि - पुरुष प्रमाण सर्वत्र वेगवेगळे दिसून येते.

भारतामध्ये 2001 मध्ये स्त्रि - पुरुष प्रमाण 933 होते, तर 2011 मध्ये ते 943 ऐवढे आहे. म्हणजेच 2001 पासुन 2011 पर्यंत स्त्रि - पुरुष प्रमाणामध्ये 10 % ने वाढ झालेली दिसून येते. भारतामधील जिल्हानुसार सर्वात जास्त स्त्रि - पुरुष प्रमाण आसणारे दोन जिल्हे माहे (पुडुचेरी) येथे स्त्रि - पुरुष प्रमाण 1176 असुन अल्मोडा या उत्तराखंड जिल्ह्यात हे प्रमाण 1139 इतके आहे. तसेच भारतातील सर्वात कमी स्त्री - पुरुष प्रमाण आसणारे दोन जिल्हे यामध्ये दमन येथे 533 प्रमाण व लेह (जम्मू काश्मीर) येथे 583 इतके स्त्री - पुरष प्रमाण आहे. भारतातील सर्वात जास्त स्त्री - पुरुष प्रमाण आसणारे राज्य यामध्ये केरळ - 1084, तमिळनाडु 996, आंध्रप्रदेश 993, माणीपुर 992, व छत्तीसगढ 991 असुन कमी स्त्री - पुरुष प्रमाण आसणारे राज्य यामध्ये हरियाणा 879, जम्मु काश्मीर 889, सिक्किम 890, पंजाब 895 व उत्तर प्रदेश 912 हे आहेत.

**सारांश :**

स्त्रिला अजुनही दिला जाणारा कनिष्ठ दर्जा 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा' या सारखी परंपरागत मते व परिणामी मुर्लीकडे होणरे दूर्लक्ष व हेडसांड ही देशातील स्त्री - पुरुष प्रमाण प्रतिकूल असण्या मागील कारणे आहेत. परंतू अलिकडील काळात स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टीकोन बदलत आहे. स्त्रियांना सामाजिक सुरक्षितता, आरोग्य विषयक सुधारणा केल्या तर निश्चितच स्त्रियांच्या प्रमाणात वाढ होईल.

**संदर्भ :**

1. भारतीय अर्थव्यवस्था व नियोजन - के. सागर
2. भारतीय अर्थव्यवस्था - श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे
3. भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. एन.एल. चव्हाण
4. महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी - 2011-12 व 2012-13
5. इंटरनेट

# सामाजिक बदल
## आणि सद्यस्थिती

संपादक

डॉ. बालाजी शिंदे | डॉ. अंगद गडमे



सामाजिक बदल आणि सद्यस्थिती संपादक - डॉ. बालाजी शिंदे / डॉ. अंगद गडमे



प्रा.डॉ.बालाजी लक्ष्मणराव शिंदे
(B.M.C.J., M.A.M.C.J., PH.D.)
वृत्तपत्रविद्या, विभागप्रमुख,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय
राणीसावरगाव तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी
मो.नं.९४२०१७६५८२,
E-mail : patilbalaji53@gmail.com

अनुभव: अध्यापन १० वर्ष, दैनिक हिंदुस्थान, दैनिक पुढारी, दैनिक पुण्यनगरी, इत्यादी वृत्तपत्रात पंधरा वर्षांचा अनुभव.
कृषी पत्रकारिता या विषयावर पुस्तकाचं लेखन.
राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन.
विविध विषयांवरती लेखन.



डॉ. अंगद गडमे
एम.ए.एम.फिल. पीएच.डी.
सहाय्यक प्राध्यापक
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय
राणीसावरगाव जि.परभणी

अध्यापन अनुभव: पदवी ११ वर्ष
राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्य, व विद्यापीठ स्तरीय चर्चासत्र, परिषद, कार्यशाळेत सहभाग व पेपर वाचन
राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन- मार्च २०१९
मराठी समाजशास्त्र परिषद, महाराष्ट्र – आजिव सदस्य

ISBN 978-81-921155-6-6

प्रथमेश प्रकाशन, नांदेड

# Post-Globalisation: Socio-Economic Problems before Indian Economy

**Dr. N. K. Muley**
Asso. Prof., Sunderrao solanke Mahavidhyalaya,
Majalgaon, Dist. Beed.
Mo. No.: 9657050064

Abstract:

After several years of subjugation by Britisher's,India was trying hard to bring it's economy on the track of development with the help of planned model of economy. In pre- globalisation period, immediately after independence the emphasis of India have been on agricultural sector. further it sharply shifted from unproductive agriculture sector to industrial sector. Till economic reforms of 1991, India's journey towards the development was very slow and the growth rate of the country was unable to cater to the vast and emerging needs of ever increasing population of India. This phenomenon leads to the increasing poverty and unemployment year by year rather to decrease it. After 1991, the pace of rate of growth of the Indian economy increased which helps somehow to bring down the rate of unemployment and poverty. Although after 1991 India still dealing with decades long fundamental problem of unemployment, poverty, social security and so on. This article throws light on the prevailing problems and prospectus before Indian economy after globalisation.

Keywords: Globalisation, Economic reforms, Poverty, Unemployment, Growth Rate, Economic Development.

## 1. Introduction:

India was a backward economy at the time of independence. India's state of the economy at the time of independence can be characterised as: a) stagnant and steady agriculture, b)poor technological and scientific capabilities, c) limited industrialisation,

d) less developed means of transport and communication, e) inadequate health and educational facilities, f) absence of social security arrangements and g) rampant poverty and unemployment. If we see the pre-globalisation period, the development pattern of India is characterised by centralised planning, government's regulation over basic and key industries, excessive control private industries, trade protectionism through tariff and non-tariff barriers and cautious and selective approach towards foreign capital. These were the obstacles in front of the foreign capital flow in India before 1991. As a result Indian economy grew at an average rate of 3.5% per annum during first thirty years (1950-1980) after independence. Consequently economic reforms were undertaken, though on a small scale by reducing control over industries through industrial policy 1985. Economic reforms get boosted when government of India announced a new industrial policy in 1991, since then the process of liberalisation, privatisation and globalisation is underway. As a result of this move,employment opportunities gets increased with the flow of foreign capital which helps to curb decades long problem of poverty to some extent. India developed a good foreign relation which helps to advance in new technology and technical know-how in collaboration with the foreign countries.

2. Objectives of the research paper

The present research is written by keeping in view the following objectives:

2.1 To understand the concept of the globalisation.

2.2 To know the prospectus of Indian economy after globalisation.

3.Data Collection

The present research paper is based on secondary data i.e., books, journals, websites etc.

4. Research Method

The present research paper describes the problems and prospectus of Indian economy after globalisation. Hence descriptive method of

research is used.

5. Problems before Indian economy after globalisation

5.1. Problem of poverty: The root cause of social insecurity in India is poverty and it is because the lack of adequate employment opportunities. Widespread poverty in India is because of no. of. factors viz., population explosion, lack of industrialisation, failure of land reforms, failure of fiscal policies in reducing the gap between rich and poor. Poverty in India is chronic and multidimensional phenomenon. There is geography of poverty as poverty being concentrated in rural areas of certain states. There is sociology of poverty with certain social groups suffering the most, unfavourable land-man ratio also leads to increase in poverty.

5.2. Problem of Unemployment: Unemployment is a situation when willing workers fails to get jobs at prevailing wage rate. Unemployment is found in both rural as well as urban area.

5.2.1. Urban unemployment: urban unemployment may be classified into two categories: a) industrial unemployment, b) educated unemployment. Till the mid-1960, industrial expansion in the country was quite satisfactory and hence labour could be absorbed in the urban industrial pockets. In the mid 1960's the rate of growth of industrial development revealed the problem of industrial unemployment in urban areas the problem of unemployment is linked with fluctuations in the state of business, transport, industry Any change in this is reflected in increase or decrease in employment figures.

5.2.2 Rural unemployment: Unemployment in agricultural sector is the most serious problem. Basically seasonal and open unemployment is found in Indian agriculture sector. Over crowdedness is another reason of rural unemployment. Hence marginal productivity of many hands in agricultural sector is zero.

5.3. Inclusive growth and social security: inclusive growth may be defined as growth that promotes equal opportunities and increases access to these opportunities. This concept appears in Asian Development Bank's Strategy 2020. The main idea in

ADBS approach is to focus on productive employment as an important element of inclusive growth. Inclusive growth has three dimensions:

a) Equity among all sections of the society.

b) Equity among all sectors of the economy,

c) Equity among all regions in the country.

Growth is inclusive when it creates economic opportunities along with ensuring equal access to them. Social security is an essential ingredient in the protection, development and full utilisation of human resources.

5.4. Food and energy security: Food security has been one of the major components of social security. After 26 years of globalisation India still have to struggle for food security. Recently India have passed National food security act to ensure food availability to the poor people at the minimum price.

5.5. Energy Security:India currently ranks as the world's seventh largest energy producer accounting for about 2.49% of worlds total annual energy production. It is also the world's fifth largest energy consumer accounting for about 3.45% of the world's total annual energy consumption. However, owing to its massive population estimated at present 127 crore which accounts for 16.4% of world's population. India's per capita consumption is one of the lowest in the world.

5.6. Regional Inequalities: Regional imbalances in India are cause of concern. Successive plans have failed to reduce the income inequalities between urban and rural areas. After globalisation most of the industries are located in the urban areas hence several other problems are creating like concentration of population, pressure of providing infrastructure facilities to large amount of people residing in urban area.

5.7. Digital tools for governance:Digitalising the governance is one of the major problems in front of the government. India's large amount of population is financial illiterate, this will take decades to make Indian population financial literate. Government is taking initiatives like DBT, Jan DhanYojana, linking several

services with Aadhar, developing online service portals. These all services become the milestones once country overcome the problem of financial illiteracy.

5.8. Environmental protection and sustainable development: Rapid growth of industrialisation in India after 1991 helped to solve the major problems like poverty, unemployment and also became a major cause of environmental degradation. Now India is focusing towards the healthy industrialisation so that the development of the nation will be achieved but in a sustainable way.

**6. Conclusion:**

Indian economy has a history of overarching economic policies right from the independence to the dramatic economic reforms of 1991. During the five year plans initiated in the 1950's the economic reforms of India somewhat followed the democratic socialist principle with more emphasis on the growth of the public and rural sector, central planning, business regulation and intervention of the state in the finance and labour market. But this model of economy doesn't help India to solve the problems of billions of people residing in India with a hope to enjoy the sweet fruits of the independence after several years of subjugation. The real journey of India towards the global economy started somewhat slightly by liberalising its economy in 1985. But in 1991, India's financial condition became very worse that they could not be able to manage foreign exchange to meet the imports of at least of seven days. Since then India slowly take a nerve of the development with liberalising its economy, inviting foreign capital opening the door of the key sectors of the economy to the foreign companies. This move helps India to reduce the severity of the problem of poverty & unemployment but invited other emerging problems like environmental degradation, regional imbalance and so on. Although, there are always two sides of the coin. Now India is progressing towards becoming real global economy with the goal of sustainable development.

**References:**

1) Govt. Of India, Ministry Of Finance, Budget Speech of the

Finance Minister, 2013-14.

2) Govt. Of India, Planning Commission, An Approach To The Twelfth Five Year Plan, October2011, P.5.

3) Govt. Of India, Planning Commission, An Approach To The Eleventh Five Year Plan, November 2006, P.5.

4) Govt. Of India, Planning Commission, An Approach To The First Five Year Plan(1951-1956), Pp. 437-38.

5) Twenty five years of economic reforms of India (1991-2016), m. m. Sury, new century publications new Delhi, ISBN 978-81-7708-350-7, pp. 3-4.

6) Twenty five years of economic reforms of India (1991-2016), m. m. Sury, new century publications New Delhi, ISBN 978-81-7708-350-7, pp. 41-47.

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II
IMPACT FACTOR /

Ajanta Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | शेतीवर आधारीत उद्योगधंदा<br>**डॉ. सुभाष प्रभू राठोड** | १-४ |
| २ | भारतीय शेती व कमी उत्पादकतेची कारणे<br>**प्रा. डॉ. बी. आर. शिंदे** | ५-७ |
| ३ | जागतीकीकरण आणि भारतीय शेती व्यवसाय<br>**प्रा. डॉ. शिवांगी संजयराव दहिटणकर** | ८-१० |
| ४ | सेंद्रीय शेती<br>**डॉ. सोंडगे तात्याराम परमेश्वर** | ११-१३ |
| ५ | शाश्वत कृषी विकास आणि सेंद्रिय शेती<br>**डॉ. सुभाष रा. यादव** | १५-१८ |
| ६ | भारतीय शेतीची उत्पादकता : एक अभ्यास<br>**प्रा. दिनकर टकले** | १९-२२ |
| ७ | भारतीय शेतीचा शाश्वत विकासात पायाभुत सुविधाचे योगदान<br>**प्रोफेसर डॉ. के. के. पाटील**<br>**सतिश दिलीपराव तोडकर** | २३-२६ |
| ८ | वातावरण बदलाचे शेतीवरील परिणाम<br>**डॉ. विश्वनाथ कोक्कर** | २७-२९ |
| ९ | कृषी आणि शाश्वत विकास<br>**अप्पाराव वागडव** | ३०-३२ |
| १० | हरितक्रांतीचे परिणाम<br>**डॉ. नंदकिशोर मुळे** | ३३-३५ |
| ११ | शाश्वत शेती काळाची गरज<br>**चंद्रकांत रामराव वलाकटे** | ३६-४० |
| १२ | शेती व्यवसायातील शाश्वत विकास समस्या आणि उपाय<br>**प्रा. विठ्ठल जी. चव्हाण** | ४१-४४ |
| १३ | शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे<br>**भगवान विष्णु शिंदे** | ४५-४७ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १०. हरितक्रांतीचे परिणाम

**डॉ. नंदकिशोर मुळे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक, सुंदररावजी सोळंके महाविद्यालय, माजलगाव , जि. बीड.

## प्रस्तावना

कॅरोल स्ट्रीटरने ज्याचे वर्णन 'one of the most amazing agricultural stories of all time' असे केले ती हरित क्रांती म्हणजे शेतीच्या विकासासाठी लागू केलेले नवीन तंत्रज्ञान होय. स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनामार्फत शेती विकास कार्यक्रम आखले गेले परंतु भारतामध्ये अन्नधान्य वाढीचा वेग हा लोकसंख्या वाढीच्या वेगापेक्षा कमी होता अशा स्थितीत पिकाच्या उत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने एक धाडसी कार्यक्रम हाती घेण्यात आला. तो म्हणजे हरितक्रांती. "हरितक्रांती ही संज्ञा १९६० पासुन प्रचलित आहे. १९७० चे नोबेल पारितोषिक विजेते डॉ.नॉर्मन बोरलॉग यांच्यामुळे जगातील हरितक्रांतीला सुरुवात झाली, तर भारतातील हरितक्रांतीचे श्रेय प्रोफेसर एम.एस.स्वामीनाथन यांना दिले जाते. भारतात १९६६-७० साली हरितक्रांती अंमलात आणली गेली."

हरित क्रांतीचा अभ्यास करण्याच्या अगोदर आपण क्रांती या शब्दाचा अर्थ लक्षात घेऊ. क्रांती ह्या शब्दात दोन बाबी समाविष्ट असतात. एक- कोणत्याही घटनेत तीव्र परिवर्तन होणे हे परिवर्तन इतके तीव्र असते की ते आपणास स्पष्ट जाणवते. दोन ह्या परिवर्तनाचे परिणाम दिर्घकालीन असतात आणि ते निरंतर होत राहतात. जर आपण क्रांती हा शब्दाच्या अगोदर हरित हा शब्द जोडला तर सलग शब्द तयार होतो 'हरितक्रांती'.

## हरितक्रांतीचा अर्थ

'एक- अल्पकाळात कृषि उत्पादनात जलद गतीने वाढ होणे, ही वाढ स्पष्ट जाणवण्याइतकी मोठी राहाणे आणि दोन- कृषि उत्पादनात दीर्घकाळातही निरंतर वाढ होत राहणे होय'.

भारतात हरित क्रांती व्यापक स्वरुपात नंतर घडून आली असली तरी १९६०-६१ मध्ये सरकारने जो, 'सघन शेतीचा जिल्हा कार्यक्रम' (IADP) लागु केला तेव्हापासुन या क्रांतीची चाहूल लागली. पुढे १९९३-९४ मध्ये संकरित वाणांचा प्रवेश झाला धाण व गव्हाच्या वाणांचे यशस्वी प्रयोग पाहुन सुधारित बियाण्यांची आयात करणे व लागवड करणे सुरु झाले. हे वाण इतक्या लवकर लोकप्रिय झाले की, केवळ दोनच वर्षात गव्हाच्या उत्पादनात ४५ प्रतिशत वाढ घडून आली. अशा तऱ्हेने भारतात अनेक पिकांच्या बाबतीत हरित क्रांती घडून आली. त्याचा भारतातील शेतीवर फार मोठ्या प्रमाणावर उत्पन्न वाढीचा परिणाम झाला. परंतु या हरितक्रांतीचे काही परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर दिसून आले ते पुढील प्रमाणे-

**हरितक्रांतीचे परिणाम**

ज्यावेळी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरु झाला तेव्हा त्याचे वर्णन 'शेतीमधील क्रांतीकारक बदल असे करण्यात आले. हरित क्रांतीमुळे संपूर्ण शेतीचे स्वरुपच बदलून जाईल अशी अपेक्षा होती. भारतामध्ये असा बदला किती प्रमाणात घडून आला याचे विवेचन आपण थोडक्यात केलेले आहे. परंतु हरित क्रांतीमुळे जे काही गंभीर परिणाम घडून आले त्यांच्याकडे दूर्लक्ष करता येणार नाही. हरित क्रांतीची उज्ज्वल बाजु मान्य करुनही या परिणामांचे गांभीर्य कमी होत नाही.'

**१. केवळ गव्हाची क्रांती**

लोकांच्या उपभोगाच्या आणि उद्योगांच्या उपयोगाच्या दृष्टीकोणातुन अनेक प्रकारचा शेतमाल महत्त्वाचा असतो. आर्थिक विकासाच्या काळात या सर्व मालाचे उत्पादन व उत्पादकता वाढविणे आवश्यक असते. परंतु गव्हाचा अपवाद वगळता इतर पिकांचा प्रतिसाद अतिशय मंद आहे. धान, बाजरी, मका व ज्वारी यांच्या उत्पादनात काहीसा बदल झाला. परंतु 'क्रांती' असे म्हणण्याइतका नाही.

**२. उत्पन्नातील वाढतील विषमता**

कृषि क्षेत्रातील तांत्रीक बदलामुळे ग्रामीण भागातील उत्पन्नाच्या वितरणावर अत्यंत प्रतिकुल परिणाम झाला आहे. त्यामुळे निरनिराळ्या प्रदेशातील विषमताचे नव्हे तर छोटे आणि मोठे शेतकरी, जमीन मालक आणि भूमिहीन मजूर तसेच शेतीवरील कुळे यांच्यातील असमाताही आणखीनच वाढली आहे.

**३. मर्यादित प्रभावक्षेत्र**

ही क्रांती ठरावीक आणि लहानशा भागांमध्येच यशस्वी ठरली. पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश या राज्यातील काही जिल्हे तसेच महाराष्ट्रातील पश्चिम भाग आणि तमिळनाडू या राज्यांमध्ये ही क्रांती यशस्वी झाली. परिणामी इतर ठिकाणी शेतीत वाईट दिवस येतांना दिसतात.

**४. मोठ्या भूधारकाचा फायदा**

हरित क्रांती ही मुळात तांत्रिक बदल दर्शविते तिचा आंगीकार करण्यासाठी बऱ्याच गोष्टी माहित आसायला हव्यात. तसेच पाणी पुरवठ्याच्या सोयी, प्रत्ययपुरवठा, खते व रसायने, अवजारे यांच्या उपलब्धदेशिवाय नवीन तंत्रज्ञान लागड करता येत नाही. हे सर्व घटक असे आहेत की जे फक्त मोठया भूधारकांनाच अनुकूल असु शकतात. व त्यांच्यातच बदल घडून येतो परिणामी छोट्या कास्तकारांचा वर्ग यापासून कोसोदुर राहतो.

**५. विषमतेत वाढ**

हरित क्रांतीमुळे प्रादेशिक आणि ग्रामीण उत्पन्नाच्या विषमतेत झालेली वाढ हा तिचा सर्वात गंभीर परिणाम आहे. हे नवीन तंत्रज्ञान प्रामुख्याने ओलीताच्या सोयीवर अवलंबून असल्याने ज्या प्रदेशांमध्ये सिंचनाचा विकास झाला आहे त प्रदेशांना या सुधारणांचा जास्त फायदा मिळणे अपरिहार्य आहे. परिणामी जो प्रदेश सिंचनापासुन मागासलेले आहे ते हरित क्रांतीपासून दूर राहिला.

**६. हरित बेटांची नर्मिती**

हरित क्रांतीमुळे देशातील विकसित राज्यांमध्ये हरित बेटांची निर्मिती झाली. देशातील अल्प भागात बेटांची निर्मिती आणि सिंचन सुविधा नसलेला भाग उजाड माळरानाचा अशी विचित्र परिस्थिती भारतात निर्माण झाली.

**७. रोजगारावरील परिणाम**

भारतातील ग्रामीण रोजगाराचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे शेतीच्या नवीन तंत्रज्ञानामुळे त्यावर विपरित परिणाम होतांना दिसत आहे. हरित क्रांतीमुळे ५५% श्रमिक केवळ ट्रॅक्टर पंपसेटमुळे बेकार झाले होते. म्हणून तांत्रिक सुधारणांच्या बरोबरीने पर्यायी रोजगाराच्या सोयी निर्माण न केल्यास 'शेतमजूरांची बेकारी' आपल्या आर्थिक व राजकीय दृष्ट्या स्फोटक परिस्थितीमध्ये नेऊ शकते.'

**८. शोषणाचे साधन**

हरितक्रांतीमध्ये प्रामुख्याने रासायनिक खते व किटकनाशके, तणनाशके यांचा वापर करण्यावर भर दिला जातो. या वस्तुंचे उत्पादन विकसित देशातील कंपन्या करत आहेत, असे विकसित देश विकसनशिल देशातील लोकांचे शोषण करुन घेतात. परिणामी अशा कंपन्या 'जीवशास्त्रीय साम्राज्यवाद' करत असल्याचे दिसून येते व तो पसरविण्याचे कार्य या कंपन्या करीत आहेत व हरितक्रांती हे त्याचे प्रमुख साधन आहे.

**९. दोषपूर्ण विकास धोरण**

भारतातील हरितक्रांतीचे प्रतिमान अमेरिकन प्रतिमानावर आधारित होते. या प्रतिमानात गहु उत्पादनावरच लक्ष केंद्रीत करण्यात आले. वस्तूतः भारतात गहु उत्पादनापेक्षा तांदूळ उत्पादनास नैसर्गिक परिस्थिती जास्त अनुकूल आहे जर नविन विकासाचे प्रतिमान जपानी प्रतिमानावर आधारित राहिले असले तर कदाचित जास्त चांगला परिणाम झाला असता.

**सारांश**

हरितक्रांती ही उत्पादन वाढीचे माध्यम जरुर आहे, पण तिचे जे इतर परिणाम संभावतात ते टाळणे आवश्यक आहे. यासाठी निरनिराळ्या आदानांच्या वाजवी वापर, कोरडवाहु शेतीच्या तंत्राचा विकास, संख्यात्मक सुधारणा, सिंचनाचा विस्तार, शेतमजुरांसाठी योजना, अविवेकी यांत्रिकीकरणावर निर्बंध, तज्ञ मार्गदर्शन इतर पिकांचा समावेश इत्यादी घटक विचारात घेऊन उपाययोजना करायाला हवी.

**संदर्भ सूची**

१. डॉ.विजय कविमंडन- कृषी अर्थशास्त्र
२. प्रा.एन.एल.चव्हाण- भारतीय अर्थव्यवस्था
३. श्रीधर व विनायक देशपांडे- भारतीय अर्थव्यवस्था
४. "शेतकऱ्यांच्या आत्महत्या : वास्तव, कारणे व उपाय"- आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद.

Indian Council of
Social Science Research

ICSSR, New Delhi Sponsored

# NATIONAL SEMINAR

on

# FINANCIAL LITERACY AND DIGITAL PAYMENT SYSTEM IN INDIA

28th December 2019.

**Organized by**

**K.S.P.M.'S**

**Vasantrao Kale Mahavidyalaya, Dhoki,**

**Tq. & Dist. Osmanabad (MS)**

**(Department of Economics)**


Chief Editor

**Dr. Haridas Fere**

(Principal)

Editor

**Dr. B.V. Maind**

(Convener)

| Sr. No. | Name of Author | Title Of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 76. | आर. डी. गणापुरे<br>डी. पी. बिराजदार | आर्थिक साक्षरता आणि भारतीयांची गुंतवणूक प्रवृत्ती | 232 |
| 77. | ज्योती ललित अधाने | डिजिटल इंडिया व वित्तीय समावेशन | 236 |
| 78. | डॉ.ज्ञानेश्वर जिगे | रोकड विरहित अर्थव्यवस्था : भारताच्या संदर्भात संधी आणि आव्हाने | 240 |
| 79. | डॉ. सुनिल अण्णा गोरडे | राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) प्रणालीचे एक अर्थशास्त्रीय विश्लेषण | 242 |
| 80. | डॉ.प्रमोद बालाजीराव बेरळीकर | कॅशलेस व्यवहार व ग्रामीण अर्थव्यवस्था | 244 |
| 81. | प्रा. डॉ. अनंत नरवडे | रोकडविरहित अर्थव्यवस्था- समस्या आणि उपाय | 246 |
| 82. | गोविंद रामराव काळे<br>डॉ. दिपक एम. भारती | भारतातील रोकडविरहीत व्यवहार : एक आव्हाण | 249 |
| 83. | प्रा. डॉ. ए. टी. शेवाळे | भारतातील ई-कॉमर्स - आर्थिक व्यवहार व विनिमय | 251 |
| 84. | प्राचार्य डॉ. हरिदास फेरे<br>डॉ. बी.व्ही. मैंद | भारतातील डिजिटलायझेशन आणि डिजिटल पेमेंट सिस्टिम एक अभ्यास | 254 |
| 85. | डॉ.माधवराव नरसिंगराव बिरादार | रोकडरहित अर्थव्यवस्था व रोकडरहित व्यवहाराचे विविध पर्याय | 256 |
| 86. | श्यामराव लक्ष्मण वासनीकर<br>प्रा डॉ. विजय भोपाळे | कॅशलेस अर्थव्यवस्था आव्हाने आणि उपाय | 259 |
| 87. | डॉ. एस.एस.देवनाळकर | डिजीटल पेमेंट सिस्टिमचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 261 |
| 88. | एम. एस. बिडवे | डिजीटल ग्रंथालय, साहित्य सादरीकरण व शोधप्रक्रिया : एक अभ्यास | 263 |
| 89. | डॉ. मिनाश्री भास्कर जाधव | डिजिटल साक्षरता आणि भारतीय अर्थव्यवस्था | 266 |
| 90. | राहुल शिवाजी तिगोटे<br>डॉ. दीपक भुसारे | काळया पैशाला लगाम : रोखरहित अर्थव्यवस्था | 269 |
| 91. | आकाशनाथ दत्तात्रय बोरकर,<br>डॉ. एन.के.मुळे | निश्चिलनीकरण आणि रोकडविरहित अर्थव्यवस्था | 271 |
| 92. | डॉ. कार्तिक पोळ<br>प्रा. प्रमोद मुळे | रोकड विरहित व्यवहारात सरकारने केलेले प्रयत्न | 276 |
| 93. | प्रा. आचार्य बालाजी वैजनाथराव | रोख विरहीत व्यवहार : आव्हाने व उपाय | 278 |
| 94. | डॉ. ए. एच. अत्तार | डिजिटल इंडिया मोहीम : एक आर्थिक क्रांती | 281 |

# निश्चिलनीकरण आणि रोकडविरहित अर्थव्यवस्था

**आकाशनाथ दत्तात्रय बोरकर,**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापिठ,औरंगाबाद

**डॉ. एन.के.मुळे**
सहयोगी प्राध्यापक वअर्थशास्त्र
विभाग प्रमुख, सुंदरराव सोळंके,
कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय,माजलगांव, जि. बीड.

**प्रस्तावणा :**

नोटबंदीने सर्व अर्थव्यवस्थेला रोख पैसे न वापरण्यास उत्तेजन मिळाले आहे. डिजिटल अर्थव्यवस्था असण्याबाबत कुणाचेचे दुमत नाही, पण त्यासाठी पायाभूत सुविधांची गरज आहे. ग्रामिण भागात केवळ २०.८ टक्के एटीएम आहेत व ते सरकारी बँकाचे आहेत ८.५ टक्के एटीएम हे खासगी बँकांचे आहेत. ग्रामिण भागत एटीएमची संख्या कमी आहे. इ-वॉलेट व मोबाईल पेमेंटला स्मार्टफोन लागतो पण बऱ्याच लोकांकडे ते नाहीत. वेगवान इंटरनेट जोड आवश्यक असतो ती सुविधाही फारशी नाही. सार्वजनिक वायफाय, मोबाईल चार्जिग स्टेशन सुविधा कमी आहेत. सायबर सुरक्षा हा चिंतेचा मुद्दा आहे. कारण यातील तपशील गुप्त राहणे आवश्यक असते. छोटे दुकानदार जेव्हा स्वाइप कार्ड स्वीकारतात, तेव्हा त्यांना जोखीम मुक्ततेची हमी असली पाहिजे. कार्डाची नक्कल झाली तर कष्टाचा पैसा जाऊ शकतो. ऑक्टोबर २०१६ मध्ये तीस लाख डेबिट कार्डची माहिती एटीएममधून फुटली व ग्राहकांना सांकेतांक (पिननबंर) बदलण्यास सांगण्यात आले. त्यानंतर महिनाभराने नोटबंदी झाली व कार्डाचा वापर वाढला. व्यवस्थेवर ताण वाढला. कार्ड मशीन काम करेनासे झाले व लोकांना तासन तास रांगेत उभे रहावे लागले. काळा पैसा, भ्रष्टाचार व दहशतवादाला आळा घालणे हा नोटाबंदीचा हेतू असल्याचे सरकारने सांगितले पण लोकशाही पध्दतीत राजकीय पक्षांना मिळणारा निधी हा भ्रष्टाचाराचा एक मोठा मार्ग आहे. उच्च स्तरीय भ्रष्टाचारात पैशाचा समावेश असतोच असे नाही. त्यामुळे राजकीय पक्षांच्या निधीत पारदर्शकता आणणे. आवश्यक आहे. पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहे. धोरणात्मक उणिवा टाळल्या पाहिजेत. लोकांच्या अडचणी सरकारने समजून घेतलया पाहिजेत तरच कॅशलेसचे उद्दिष्ट समस्या व जोखमीविना साध्य होईल.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री ८.३० वा. भारताच्या चलनाचे विमुद्रीकरण निर्णय जाहिर केला की, रात्री १२ नंतर ५०० व १००० च्या नोटा चलनातुन बाद केल्या जातील. ३० डिसेंबर २०१६ पर्यंतच पोस्ट खात्यात / किंवा बँक खात्यात हे चलन भरता येईल. व त्याऐवजी पर्यायी चलन प्राप्त करता येईल. त्यानंतर या नोटा (चलनातुन बाद झालेल्या नोटा) दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत लेख प्रतिज्ञापत्र भरुन रिझर्व्ह बँकेत जमा करता येतील. लवकरच ५०० रु. च्या व २००० च्या नविन नोटा भारताच्या चलनात व व्यवहारात येतील या नोटा विशेष प्रकारच्या असतील. नोटा बँकेत अथवा पोस्टात बदलण्यासाठी किंवा जमा करण्यासाठी आधार कार्ड / पॅन कार्ड आवश्यक करण्यात आलेल आहे. सी.एन.जी गॅस, पेट्रोल पंप, हॉस्पीटल आणि धावुक बाजारात दिनांक ११ नोव्हेंबद २०१६ पर्यंत जुन्या ५०० व १००० रु. च्या नोटा स्विकारल्या जातील. दिनांक ८ नोव्हेंबर २०१६ च्या मध्यरात्रीपासुन, (००.०० तास) भारतातील सर्व बँकांचे एटीएम बंद राहतील. ते दिनांक ९ व १० नोंव्हेबरला देखील बंद राहतील.

या व्दारे खोटा चलनाला पण रोध बसणार आहे. काळया पैशावर, भ्रष्टाचारावर तसेच मोठया प्रमाणात असणाऱ्या बनावट नोटांच्या परीचलनावर याव्दारे आळा बसु शकेल. त्या सोबतच हत्यारांच्या स्मगलींग करीताच्या निधिवर, हेरगिरीवर आणि दहशतवादावरही नियंत्रण येईल असा भारत सरकारचा दावा आहे. यामुळे भारतातील अनेकांना आपली बेहिशोबी संपत्ती नाईलाजाने बँकेत जमा करावी लागली, त्यांची मोठीच पंचायत झ ाली. सर्वप्रथम म्हणजे नोट बंदी या मोहिमेचे चुकीचे नाव आहे. दुसरा प्रचलीत शब्द म्हणजे निश्चिलनीकरण असा शब्दप्रयोग करावा.

**निश्चिलनीकरण**

निश्चिलनीकरण म्हणजे अशी कृती की ज्याव्दारे एखाद्या देशाचे सरकार एक किंवा एकापेक्षा अधिक चलनाचे वैध स्वरुप काढुन घेते. निश्चिलनीकरणाच्या प्रक्रियेत सर्वच चलनी नोटा काढूण घेणे, व ज्या नोटा काढून घेतल्या जाणार आहेत त्यांच्या नेमक्या तेवढयाच मूल्याच्या नव्या चलनील नोटा बाजारात आणणे अथवा सर्व जुन्या चलनी नोटांच्या बदल्यात संपूर्णपणे नवीन चलनी नोटा बाजारात आणणे यांचा समावेश आहे. भ्रष्ट मार्गाने जमा केलेला काळा पैसा उघड करण्याच्या हेतूने सहसा निश्चिलनीकरणाची ही प्रक्रिया राबवली जाते. जॉन इटवेल. पालग्रेव्हच्या राजकीय अर्थशास्त्रज्ञाने निश्चिलनीकरण म्हणजे एखाद्या नाण्याचा उपयोग सरकारने थांबवणे आणि अधिकृतपणे ते चलनातून काढुण घेणे अशी व्याख्या केली आहे. एन. बी. घोडके, एनसायक्लोपिडिक डिक्शनरी ऑफ इकॉनॉमीने चलनी नोंटाच्या प्रमाणात निश्चिलनीकरण म्हणजे चलनी नोटांचे चलनातून घाऊक काढूण घेणे असे म्हटले आहे. थॉर्प अँड थॉर्प ( २०१०) यांनी काळया बाजारातील तसेच बेहिशोबी पैशावर हल्ला चढवण्यासाठी चलनाचे बाजारातून काढून घेणे म्हणजे निश्चिलनीकरण असे मत व्यक्त केले आहे. केवळ भारतातच नव्हे तर अनेक देशानी उदाहरणार्थ अमेरिकेने १९६९ मध्ये, झैरेने १९९० मध्ये, ऑस्ट्रेलियाने १९९६ मध्ये, डिम्बाब्वेने २०१० मध्ये तर उत्तर कोरियाने २०१० मध्ये निश्चिलनीकरणाचा पर्याय वापरला आहे. परंतू अमेरिका व ऑस्ट्रेलिया या प्रयत्नाला यश मिळाले तर अविकसित आफ्रिकन देशांमध्ये हे प्रयत्न अपयशी ठरले.

**भारतामधील निश्चिलनीकरण**

५०० व १००० रुपयांच्या नोटांवर बंदी घालण्याची भारतातील हि आतापर्यंतची तीसरी वेळ आहे. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिलेल्या धक्क्यातुन अनेकजन आजुन सावरलेले नाहीत. यापूर्वी दोन वेळा नोटांचे डिमॉनिटायझेशन करण्यात आले होते. सर्वात प्रथम १९४६ साली १०००, ५००० आणि १०,००० रुपयांच्या नोटा रदद करण्यात आल्या होत्या. त्यानंतर सुमारे वर्षा-दिड वर्षाने भारताला स्वांतत्र मिळाले होते. तत्पुर्वी १९३८ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सर्वात मोठे चलन १०,००० रु. ची नोट छापली होती. विशेष म्हणजे या तीन्ही नोटा पुन्हा १९५४ मध्ये व्यवहारात आणल्या गेल्या. १९७० च्या दशकात केंद्र सरकारने काळया पैशाची एकुण रक्कम ठरविण्यासाठी, त्याची व्याप्ती समजण्यासाठी वांचु



89

समितीची नेमणूक केली. वांचु समितीने १९७१ मधील आपल्या काळयापैशावरील अहवालात काळा पैसा म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेला जडलेला कर्करोग आहे. त्याला वेळीच आळा घातला नाही तर निश्चितच अर्थव्यवस्थेचा संपुर्ण नाश करतो, असे वर्णन केले आहे.

समिती अहवालात काळा पैसा म्हणजे केवळ बेहिशोबी चलनच सूचित करत नाही तर असा पैसा जो साठेबाजी करुन किंवा उघड व्यापारी प्रवाहांच्या बाहेरुन चलनात असतो शिवाय सोने, दागिने आणि मुल्यवान धातू यात गोपनीयरित्या केलेली गुतवणूक आहे. तसेच हिशोबवहयामध्ये दाखवलेल्यापेक्षा जास्त किंमतीच्या जमिन आणि इमारतीच्या मालमत्ता आहे, असा विचार मांडला आहे. या समितीने उच्च मूल्यांच्या चलनी नोटा काढुन घेण्याची सूचना केली होती. त्यांनतर १९७७ साली जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. त्यावेळचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी बनावट नोटा व काळा पैसा शोधण्याचा चंगच बांधला. दी हाय डिनोमीनेशन बॅक नोटस (डिमॉनीटायझेशन) ॲक्ट संमत करण्यात आला. या कायद्या अंतर्गत २६ जानेवारी १९७८ साली १०००, ५००० व १०,००० रुपयांच्या नोटा दुसऱ्यांदा रदद करण्यात आल्या. त्यावेळी आय. जी. पटेल हे रिझर्व्ह बँकेचे गर्व्हनर होते. तीसऱ्या वेळी म्हणजे ८ नोव्हेंबर २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोट बंदीचा निर्णय जाहिर केला. त्यांच्या या निर्णयाला आर बी आय चे गर्व्हनर उर्जीत पटेल यांनी पाठींबा दिला आहे. इतकेच नव्हे तर हा अत्यंत धाडसी निर्णय असल्याची पुस्तीहि त्यांनी जोडली आहे.

रदद केलेल्या नोटा देशाच्या चलनात ८६ टक्के म्हणजे एकुण देशांतर्गत उत्पन्नाच्या १२.२ टक्के होत्या त्या चलनेतुन बाद झाल्या. त्याची जागा आता नविन नोटांनी घेतली आहे. या निर्णयाचे अनेक महत्वाचे परीणाम अपेक्षित आहे. परंतु बरेच अर्थतज्ञ या निर्णयाच्या यशस्वीतेबाबत शंका व्यक्त करतांना दितस आहे. येणारा काळच हा निर्णय किती योग्य किंवा अयोग्य होता हे ठरवेल.

**निश्चिलनीकरणी करणाचे महत्वाचे हेतु.**

१. अर्थव्यवस्थेतील काळा पैसा उघड करणे.
२. भ्रष्टाचारावर नियंत्रण.
३. दहशतवादी आणि अतिरेकी कारवायांसाठी देशातील तसेच शेजारी देशातील संघटनाकडून पुरवला जाणारा बनावट नोटांचा डाव हाणुन पाडणे.

SWAYAM stands for "Study webs of active learning for young aspiring minds" and this platform hosts various MOOCs. All the MOOCs on SWAYAM have same generic structure. Here also there are **"four quadrants":**

**Quadrant I:** It consists of e-tutorials, including video and audio contents, animations, simulations, video demonstration, etc

**Quadrant II:** It consists of e-content, e-books, self- instructional materials, case studies etc.

**Quadrant III:** It is about assessment - it gives various various e-quizzes, problems and solutions, MCQs, fill in the blanks, etc. and it is to be noted that you get the feedbacks.

**Quadrant IV:** It consists of discussion forum, where learner clears their doubts and difficulties from the course coordinators.

## Conclusion

One common misconception among the people is that perhaps in future, e-learning will replace teachers; but one should remember that no one can replace a good teacher. At the end, we can say simply that MOOC will ultimately supplement traditional learning; it will empower teachers and definitely not replace them. MOOCs have the potential to make better and stronger India in the field of education. learning is free and can be accessed by anyone and these are available over the globe and joined by many learners to make it "Massive" For assessment also, a large number of institutions are opting for online examination, again it's the integration of technology with examination system. Online examination gives quick results, is uniform in grading and highly economical. ICT tools are used by teachers as well as students for internal assessment and self assessment respectively.

## References:

1) Ruth C. Clark, Richard E. Mayer (2011). e-Learning and the Science of Instruction: Proven Guidelines for Consumers and Designers of Multimedia Learning. John Wiley & Sons

2) Shah, D. and Pickard, L. (2019) Massive List of MOOC providers around the World. Access online (15-10-2019) https://www.classcentral.com/report/mooc-providers-list/

3) Sharma, Y.P. (2015) Massive Open Online Courses (MOOCs) for School Education in India: Advantages, Challenges and Suggestions for Implementation. Microcosmos International Journal of Research, 1: 1-5.

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)

February 2020 Special Issue- 22 Vol. 6

## The Role of Women in Global Development

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr. Aqueela Syed Gous

94

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 22, Vol. 6 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# Index

1. राष्ट्रीय विकास एवं महिला सशक्तिकरण — १
डॉ. सय्यद अमर फकिर

2. भारत देश के आजादी के लिए योगदान देनेवाली क्रांतीकारी महिला - दुर्गावती देवी (दुर्गाभाभी) — ३
प्रा. गडदे भारती बाबुराव

3. न्यायालयाची भूमिका आणि भारत — ५
प्रा.दत्तात्रय जनार्धन चव्हाण

4. 'गोदाकाठावरील महानुभावीय साहित्यातून अभिव्यक्त होणारी एकात्मता' — ९
डॉ. बबन श्रीकृष्ण मस्के

5. कृषी क्षेत्र आणि आर्थिक विकास — 12
डॉ. अशोक बापूराव देवकर

6. 'जागतिक मानव विकास अहवाल आणि भारताची सद्यस्थिती' — १६
प्रा. डॉ. चव्हाण एम.एच., प्रा. डॉ. सावळे एकनाथ ग्यानोबा

7. कृषी विकास आणि भारतीय अर्थव्यवस्था — २०
डॉ. देविदास नागरगोजे, डॉ. सावळे ई.जी.

8. भारतीय स्वातंत्र्यपूर्व आंदोलनात महिलांचा सहभाग — 24
डॉ. किसन मनोहर पवार

9. स्त्रियांच्या सामाजिक समस्या आणि उपाय योजना — २६
डॉ.सौ.मनिषा देशमुख

10. भारतीय शेती शोध आणि बोध — २८
डॉ.एन.के.मुळे

11. महिलांच्या समस्या : "एक अभ्यास" — ३१
प्रा. डॉ. शामल भिवराव जाधव

12. भारतीय क्रांतीकारी चळवळीत येशूबाई सावरकरांचे कार्य : एक अभ्यास — ३४
डॉ. गंगणे आर. व्ही.

13. **ग्रामीण महिलांच्या आरोग्य विषयक समस्या: कारणे व उपाय योजना** — 38
**प्रा. डॉ. पंढरी गुट्टे**

14. "भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचे योगदान" — 41
प्रा. केशव देविदासराव पावडे

15. परभणी जिल्ह्यातील लिंग-गुणोत्तर एक भौगोलिक अभ्यास — 45
डॉ. [illegible] सिंधु परसराम

95

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 22, Vol. 6 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# भारतीय शेती शोध आणि बोध

डॉ.एन.के.मुंडे
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र ,विभाग प्रमुख, सुंदरराव सोळंके, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, माजलगांव जि.बीड

**प्रस्तावना :-**

भारतातील बहुतांश लोकांचे जीवन हे कृषीवर अवलंबुन आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात नियोजनाव्दारे अर्थव्यवस्थेच्या विकासावर भर देण्यात आल्यामुळे कृषी क्षेत्रामध्ये हरितक्रांती घडवून आली. शेतजमीनीची उत्पादन व उत्पादकता वाढली. परिणामतः अन्नधान्य उत्पादनात प्रचंड वाढ झाली. अन्नधान्याच्या बाबतीत आपला देश आत्मनिर्भर झाला. इतकेच नव्हे तर अन्नधान्याची निर्यात करणे शक्य होत आहे. परंतु सध्याच्या काळात शेती व्यवसाय न परवडणारा व्यवसाय म्हणुन ओळख निर्माण होत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षांमध्ये भारतीय शेतकऱ्यांच्या वास्तव उत्पन्नात अपेक्षित सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही. सतत पडणारा दुष्काळ, अपुरा मोसमी पाऊस, कृषी वित्त पुरवठयाच्या अपुऱ्या सोयी, कृषी आदानांची प्रचंड किंमत वाढ, दोषपुर्ण विपणन व्यवस्था, कर्जबाजारीपणा, कर्जाचा अनुत्पादक वापर इत्यादी विविध समस्यांना भारतीय शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. शेतीतुन शेतकरी व शेत मजुरांच्या मुलभुत गरजांचीही पुर्तता करण्यास अडचणी निर्माण होतात त्यांना संघर्ष करावा लागतो. पिढीत झालेला शेतकरी नैराश्यतेतून आत्महत्येकडे वळत आहे. हे आपणास दररोज वर्तमान पत्रातुन दिसून येते.

**कृषि क्षेत्राचा अर्थव्यवस्थेवरील प्रभाव :-**

लोकसंख्येचा मोठा गट कृषी व संलग्न कार्यांमध्ये गुंतलेला असणे, मात्र कृषि क्षेत्राचे जी.डी.पी. मधील योगदान कमी असणे, हे विकसनशील अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे लक्षण असते.

भारताची अर्थव्यवस्था पहिल्यापासुन कृषिधारीत आहे. १९५१ मध्ये सुमारे ७० टक्के जनता कृषि व संलग्न क्षेत्रात गुंतलेली होती. आज हे प्रमाण कमी झाले असले तरी बरेच उच्च आहे.

जी.डी.पी. तील कृषि क्षेत्राचा हिस्सा २०११-१२ मध्ये १३.९ टक्के होता, तर NSSO च्या ६१ व्या फेरीनुसार २००४-०५ मध्ये कामगार लोकसंख्येपैकी ५२.७ टक्के लोक प्राथमिक क्षेत्रात गुंतलेले होते.

कृषि, उद्योग व सेवा क्षेत्रांचा GDP मधील तसेच कामगार लोकसंख्येमधील हिस्सा पुढीलप्रमाणे :-

| क्षेत्र | GDP मधील हिस्सा (२०११-१२) | कामगार लोकसंख्येतील हिस्सा (२००४-०५) |
|---|---|---|
| कृषि क्षेत्र | १३.९% | ५२.७०% |
| उद्योग क्षेत्र | २७.०% | १३.२५% |
| सेवा क्षेत्र | ५९.०% | ३४.०% |
| एकुण | १००% | १००% |

**Source CSO and NSSO ६१th Round**

**राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा :-**

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी, कृषि व संलग्न क्षेत्राचा जी.डी.पी मधील हिस्सा ५० टक्यांहुन अधिक होता. त्यानंतर तो घसरत गेला. २००९-१० मध्ये (२००४-०५ च्या स्थिर किंमतीनुसार) जी.डी.पी मध्ये कृषि व संलग्न क्षेत्राचा हिस्सा १४.७ टक्के इतका होता, तर तो २०१०-११ मध्ये घसरुन १४.५ टक्के इतका झाला.२०१०-११ मधील कृषि व संलग्न क्षेत्राच्या १४.५ टक्के इतक्या हिश्यामध्ये कृषि क्षेत्राचा हिस्सा १२.३ टक्के, वनिकी क्षेत्राचा १.४ टक्के, तर मत्स्यव्यवसाय क्षेत्राचा ०.७ टक्के इतका होता. कृषि व संलग्न क्षेत्राचा जी.डी.पी. मधील घटता हिस्सा अर्थव्यवस्थेतील सकारात्मक सरंचनात्मक बदल प्रदर्षिक करतो. विकसित औद्योगिक राष्ट्रांमध्ये कृषि व संलग्न क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ३-४ टक्क्यांपेक्षा कमी असतो, मात्र तांत्रिक प्रगतीमुळे ही राष्ट्रे देशातील जनतेच्या अन्नधान्याची गरज भागवून निर्यातीसाठी अतिरिक्त उत्पादन करु शकतात. भारतीयांनी दहा हजार वर्षे उत्कृष्ट शेती केली. येथील निसर्गाच्या जडणघडणीला धरुन शेतकऱ्यांनी अन्नाची सुलभता, विपुलता व विविधता निर्माण केली.

ब्रिटिशांनी भारतीयांना रासायनिक शेती शिकविण्यासाठी तेथील सुवर्णपदक विजेते रासायनिक शेती तज्ञ डॉ.सर अल्बर्ट हॉवर्ड यांना सन १८९५ मध्ये भारतात पाठवले. हॉवर्ड हे कोपर्निकस, ब्रुनो व गॅलिलिओ या शास्त्रज्ञांच्या परंपरेतले खरे शास्त्रज्ञ होते. त्यांना भारतीयांच्या शेती विषयी कुतुहल होते. त्यांनी ठरवले की, प्रथम भारतात फिरुन हा कृषिप्रधान देश हजारो वर्षे शेती कशी करतो ते पाहू. ते पाच वर्षे भारतात विविध ठिकाणी फिरुन शेती समजुन घेत होते ते त्यांच्या ॲन ॲग्रिकल्चरल टेस्टामेंट या ग्रंथात म्हणतात, भारतीय शेतकरी माझे गुरु आहेत. त्यांच्या कडून मी शिकलो की निसर्ग हा खरा शेतकरी आहे. एकाच खाचरात जमिनीचा कस वाढत ठेवून हजारो वर्षे शेती करणे भारतीयांकडून शिकावे ते

मिश्र व फिरती पिके घेतात. या पध्दतीची जाण आम्हा ब्रिटिशांना १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत सन १८८९ पर्यंत नव्हती. हॉवर्ड पुढे लिहितात. रसायन हे खत नसुन विष आहे, ते पिकांचे अन्न नाही. हा ग्रंथ म्हणजे ज्ञानाचे भांडार आहे, आजही तो शेती विषयक प्रमाणभुत मानला जातो. हॉवर्ड यांचे भाकीत की, यंत्राची भूक पृथ्वी भागवू शकणार नाही, हे आज खरे ठरले आहे.

ब्रिटिश राजवट येईपर्यंत भारतात उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी, अशी स्थिती होती. मात्र ब्रिटन व इतर युरोपियनांची साम्राज्ये ही मुलतः वेगळया बैठकीवर आधारीत होती. ती बैठक होती यंत्राची. यंत्रामुळे होणा-या लाखो करोडो वस्तुंच्या उत्पादनामुळे तंत्रज्ञानाची. या अमर्याद वस्तु उत्पादनाला ग्राहक हवा, बाजारपेठ हवी होती. यामुळे व्यापार मुख्य झाला.

कारण या देशात उत्पादक शेतकरी हाच उपभोक्ता होता तो स्वावलंबी होता ही औद्योगिकरण व शहरीकरणासाठी समस्या होती. अशा स्थितीत बाजार निर्माण होत नाही. म्हणुन मोठया पगाराचे आमिष देणा-या नोकऱ्या ब्रिटिशांनी तयार केल्या. शेतकरी व शेती मोडली जाईल. अशी धोरणे राबवली. कसेही करुन शेती सोडून शहरांकडे स्थलांतर करण्यास शेतीत सामावलेल्यांना भाग पाडले. त्यातुन उत्तम व्यापार, मध्यम नोकरी व कनिष्ठ शेती अशी नवी व्यवस्था निर्माण झाली. डॉ.अल्बर्ट हॉवर्ड यांनी वनस्पती व प्राणी यांच्या कुजण्यातुन हयुमस निर्मितीतुन अनेक पिकांबाबत शेती उत्पादनात काही पट वाढ करुन दाखवली होती. त्यांचा वरील ग्रंथ सन १९४० मध्ये प्रथम लंडनमध्ये प्रकाशित झाला होता. सन १९५६ पर्यंत त्याच्या सात आवृत्याही निघाल्या होत्या. त्यांनी यंत्र व रसायनांचा शेतीत प्रवेश करण्यातील धोका दाखवला होता.

रासायनिक खतांना गंधकाम्लाचा (सल्फ्युरिक ॲसिड) पाया असतो. त्यामुळे जमिनीतील जिवाणु, गांडुळे मृत झाली. रासायनिक खतांच्या वापरास मुळ पिके प्रतिसाद देईना. ती खाली पडू लागली. म्हणुन पृथ्वीवरील जैविक विविधतेचा भाग म्हणुन अस्तित्वात असलेल्या, परंतु काड व पानांचा अभाव म्हणुन वापरात नसलेल्या, मेक्सिकोतील गहू व थायलंडमधील तांदळाच्या मुळ बुटक्या वाणांचा संकर करुन गहू व तांदुळाच्या नव्या खुज्या जाती आणल्या.

यामुळे बियाणांची स्वयंपुर्णता नष्ट झाली. शेतकरी पुर्वी बियाणे विकत नव्हता ते फक्त दिले -घेतले जात होते. बियाण्यांना व एकुणच शेतीला पावित्र्य होते. जमीन काळी आई होती. गायीगुरे घरच्या माणसांप्रमाणे होती. निसर्ग, ईश्वर हे देतोय ही जाणीव होती. स्वामीनाथन नव्हे तर कंपनी पुरस्कृत, हरित क्रांती या फसव्या नावाच्या शेतीमुळे शेती संस्कृती मोडली, औद्योगिकरणामुळे सर्व गोष्टींचे वस्तुकरण करण्याची वृत्ती शेतक-यांत आली यामुळे काही काळ, काही शेतकऱ्यांना सुबत्ता आल्याचे दिसले पण या प्रक्रियेत खरा शेतकरी मेला. तथाकथित हरितक्रांतीने हजारो वर्ष नसलेला घटक म्हणजे उत्पादन खर्चाला जन्म दिला. या नव्या संकरित जाती व रासायनिक खतांमुळे तात्कालिक वाढलेल्या उत्पादनाचे गाजर शेतकऱ्यांना दाखवले गेले. परंतू यांचे दुष्परिणाम नंतर समजणार होते. ५० वर्षांपुर्वी याचे व्यसन लावण्यासाठी बियाणे व खते फुकट दिली गेली.

संकरित बियांणामध्ये किडीला तोंड देण्याची क्षमता नव्हती. शिवाय तणे जास्त उंच ठरु लागली. मग किटकनाशके, तणनाशके, बुरशीनाशके बनवणाऱ्या कंपन्या वाढीस लागल्या. तण, किटक, बुरशीने रसायनांना तोंड देण्याची क्षमता वाढवली की, अधिकाधिक विषारी रसायने शेतात ओतण्यात आली. एक दुष्टचक्र सुरु झाले.

गांधीजी म्हणत की, भारतातील प्रत्येक शेत ही एक प्रयोगशाळा आहे व प्रत्येक शेतकरी हा शास्त्रज्ञ. पाराशर ऋषिंनी २००० वर्षांपूर्वी म्हटले की, जंतुनाम् जीवनम् कृषिः कृषि हे संजीवाच्या, जीव जिवाणुंच्या जगण्याचे रुप आहे हे जीवाणु व गांडूळे जमिनीत सच्छिद्रता ठेवत होते. हवा खेळवत होते. मुळांना प्राणवायु देत होते. पाण्याचा निचरा करत होते. मुख्य म्हणजे वरील थरात पडणारा पालापाचोळा व इतर सेंद्रिय पदार्थांचे विघटन करुन त्यांना वनस्पतींना योग्य अशा अन्नात बदल घडवत होते हा जीव जिवाणू गांडूळांचा दुवा हरित क्रांतीने नष्ट झाला. रासायनिक खतांना तिप्पट वा चौपट पाणी लागत होते. त्यामुळे नद्या अडवणारी धरणे बांधली गेली. तरीही पाणी कमी म्हणुन बोअरवेल खणल्या गेल्या. भुजलाचा उपसा वाढत गेला. रसायनांमुळे सर्वच किटक नष्ट होत गेले. विषारी रसायने शिरलेल्या अळयांना खाऊन पक्षी मेले. जमिनीतील सच्छिद्रता संपल्याने ती टणक झाली. मग ट्रॅक्टर वापरले जाऊ लागले. गाई-गुरे निरुपयोगी ठरु लागली. त्यांच्या शेणाची, खताची व नांगरणीची गरज संपली असे मानले गेले. बुटक्या वाणांमुळे काड, पाने कमी झाली. त्यांचा चारा, जमिनीत खत होणे, जळण म्हणुन उपयोग होणे थांबले.

शेतकरी हजारो वर्षे भुकेसाठी अन्न पिकवत होते. जसे की ते इतर प्राणिमात्रांसाठी असते. मात्र हरित क्रांतीने बाजारासाठी धान्य पिकवण्याची कल्पना रुजवली. त्यातुन दुप्पट, तिप्पट उत्पादनाव्दारे मोठे उत्पन्न मिळवण्याची इच्छा आली. पुर्वी अन्न उत्पादन हा हेतु होता. आत पैशांचे उत्पन्न हा हेतु बनला. हे हवा व पाण्याप्रमाणे असलेली अन्न ही मुलभुत गरज भागवण्यासाठी नव्हते. उलट असा शहरी समाज वाढवला जात आहे जो हवा, पाणी व अन्न एव्हढयाच इतर प्राणीमात्रांप्रमाणे आपल्या गरजा आहे हे विसरुन गेला आहे. त्या सहज भागत असल्याने कृत्रिमरित्या उद्योगातुन बनलेल्या असंख्य वस्तु चलनाव्दारे मिळविण्याच्या मागे लागला आहे. त्याला आधुनिक जीवनशैली असे गोंडस नाव दिले आहे. हा उदरनिर्वाह नाही. कार, टिव्ही, संगणक, मोबाईल इ.वस्तुनिर्वाह आहे. मात्र यांना जगवणारा मुलभुत गरज असलेले अन्न पिकवणारे शेतकरी मात्र यांच्या एखाद्या महिन्याच्या पगारापेक्षाही कमी रकमेचे कर्ज फेडू न शकल्याने आत्महत्या करु लागले.

जगाच्या एकुण भुभागापैकी केवळ २.४ टक्के जमीन भारतात आहे. मात्र जागतीक लोकसंख्येच्या एक षष्टमांश लोकसंख्या भारतात आहे तसेच जगातील सर्वाधिक पशुधन (५१२ दशलक्ष जनावरे) भारतात आहे. आजही भारत अनेक मर्यादा आणि जागतिक आव्हानांचा सामना करतो आहे. आपल्या आशा-आकांक्षा, स्वप्ने आणि उद्दीष्टये साध्य करण्यासाठी आपल्याला अद्याप मोठा पल्ला गाठायला आहे. यापैकी, परस्परांशी निगडीत जलसंकट आणि अन्नविषयक असुरक्षितता ही संकटे अधिक लक्ष वेधणारी आहेत कारण देशातील वाढती लोकसंख्या, झपाटयाने होणारे शहरीकरण, औद्योगीकरण आणि पायाभुत सुविधांचा विकास, विस्तारीकरण, आकुंचन पावत जाणारे कृषी क्षेत्र, जंगलांचा ऱ्हास आणि नैसर्गिक स्त्रोतांची दिवसेंदिवस होणारी हानी (जंगले, गवताळ प्रदेश, पाणथळ प्रदेश-नद्या, सागरी आणि किनारी परिसंस्था), विविध क्षेत्रात

Special Issue 22, Vol. 6 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

मोठी तफावत आणि हवामान बदलाचे होत असलेले परिणाम, या सगळयामुळे आपल्या जगण्यावर आणि मुलभुत गरजांवरच परिणाम झाला आहे.

१९७२ च्या दुष्काळची चर्चा होते तेव्हा गेल्या पन्नास साठ वर्षातील सर्वांत मोठा दुष्काळ असा त्याचा उल्लेख होतो. त्यानंतरही अधुन-मधुन पडतच आला आहे दर दहा वर्षातून चार वर्षे दुष्काळ असतो. अलिकडच्या दुष्काळाची कारणमिमांसा अनेक देशातील शास्त्रज्ञ, पर्यावरणवादी करीत आहेत. दुष्काळाची भिषणता साऱ्यानांच भेडसावत आहे, आणि त्यादृष्टीने उपाय योजनाही सुचविण्यात येत आहेत. दुष्काळावर कशी मात करता येईल हे अनेक वैज्ञानिक व पर्यावरणवादी ओरडून सांगत आहेत. उपाययोजना सांगत आहेत तरीही आम्ही त्यांचे सल्ले गांभिर्याने घेतले आहेत असे दिसत नाही त्यांचा सल्ला ऐकला असता, आणि त्याप्रमाणे उपाययोजना केल्या असत्या तर आज या संकटाचा सामना करण्याची वेळ आमच्यावर आलीच नसती.

आपल्यापेक्षा अनेक देशात कमी पाऊस पडतो. तेथील लोकांना पाण्याचे महत्त्व कळले आहे. म्हणुन तिथे पावसाचा प्रत्येक थेंब अडवला जातो-जिरवला जातो व वापरला जातो आहे. इस्त्राईल हे जगातील एक उत्तम उदाहरण ते तंत्रज्ञान आमच्या देशात वापरुन आम्हालाही आमचा देश सुजलाम-सुफलाम बनवता येऊ शकतो गरज आहे फक्त राज्यकर्त्यांच्या इच्छाशक्तीची.

संदर्भ ग्रंथ :-


- भारतीय अर्थव्यवस्था - प्रा.गु.पां.देव, प्रा.ग.ना.झामरे
- भारतीय अर्थव्यवस्था -प्रा.ए.आर.रायखेलकर, प्रा.डॉ.बी.एच.दामजी
- भारतीय अर्थव्यवस्था - डॉ.सुधाकर शास्त्री
- भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) -श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे
- Indian Economy - S.K.Mishra, V.K.Puri 26th edition 2008.
- गोडवा मासिक-नोव्हेंबर २०१७
- ॲग्रोटेक मासिक-फेब्रुवारी २०१६
- योजना मासिक-सप्टेंबर २०१९


97

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

March 2021, Issue-74, Vol-01

Editor
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) National Education Policy 2020 : A Comparison with the National Policy ...
Dr. Sushil Kumar, Sangli (M.S.) ||84

15) Sex Workers and Their Human Rights
Vani Vyas, Jaipur ||89

16) जलसंवर्धनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान
प्रा. डॉ. अरूण बावा, जि. उस्मानाबाद ||99

17) बदलती शिक्षण पद्धत
श्री. बाळासाहेब रघुनाथ चव्हाण, जिल्हा— पालघर ||101

18) भूमि उपयोगाचे वर्गीकरण, पीकरचना आणि पीक रचनेतील बदल
डॉ. ढास डी.के., जि. बीड ||106

19) भारतीय संघराज्य आणि मर्यादा
प्रा. डॉ. सायबण्णा घोडके, जि. उस्मानाबाद ||109

20) विशेष आर्थिक क्षेत्र : विविध घटकावरील परिणाम व उपाययोजना
डॉ.संजयकुमार एम. कांबळे, जि.जालना ||112

21) भारतीय अर्थव्यवस्था : रोजगार संधी
डॉ. एन. के. मुळे, जिल्हा बीड ||114

22) साहित्य,समाज आणि संस्कृती यांच्यातील अनुबंधाचे दर्शन—'नाद अंतरीचा ...
डॉ.नावडकर विद्या .विजय, जि.रायगड (नवी मुंबई) ||118

23) बौध्द स्थळांचे धार्मिक परिवर्तन भारतीय पर्यटनातील संभ्रम: एक अभ्यास
डॉ. सुनिलचंद्र सोनकांबळे, जि.नांदेड ||124

24) देश के सरदार :सरदार पटेल
कुलदीप सिंह & डॉ० सुधा गुप्ता, जनपद जालौन ||129

25) भारत में ऑनलाइन शिक्षा का प्रभाव
डॉ. रेणु आशीष तिवारी, कामठी ||133

26) दादा भाई नौरोजी का आर्थिक चिंतन (धन निष्कासन के विशेष संदर्भ में)
डॉ. अभय कुमार सिंह, छपरा, बिहार ||137

27) कृष्णा अग्निहोत्री का व्यक्तित्व और कृतित्व
अपसाना खान & डॉ. रेशमा अंसारी, रायपुर (छ.ग.) ||142

करून तेथे पायाभुत सुविधा निर्माण कराव्यात.

3- SEZ साठी निवड करण्यात येणारी जमीन पडीत/नापीक असावी.

४. ज्या शेतकऱ्याच्या जमीनी SEZ मध्ये गेलेल्या असतील त्यांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र राष्ट्रीय पुनर्वसन धोरण ठरवावे.

५. सध्या SEZ मध्ये २५% प्रदेशात औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे बंधनकारक आहे. मात्र हे क्षेत्र ५०% करावे.

6- SEZ क्षेत्रात कामगारहिताचे काळजी घेण्याच्या दृष्टीकोनातुन SEZ च्या कामगार कायद्यात अनुरूप बदल व्हावेत. त्या अनुषंगाने कामगारांना त्यांचे लोकशाही हक्क प्राप्त होतील.

7- SEZ क्षेत्रात वित्त संस्था व बँकांना व्यवहारासाठी मान्यता देण्यात आली आहे. परंतु त्यांच्याकडुन कोणत्याही गैर व्यवहारांना चालना मिळणार नाही. याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

थोडक्यात जागतिकीकरण,विशेष आर्थिक क्षेत्रे या माध्यमातुन भारतीय शेती व्यवसाय,शेतकरी,शेतीमजुर संकटाच्या विळख्यात सापडला आहे. प्रसिध्द उद्योगपती नारायणमुर्ती सतत म्हणतात की, 'सकारात्मक विचार करा म्हणजे प्रगती होते'' परंतु या विस्थापीत वर्गाने कितीही सकारात्मक केवळ विचार करून त्यांचे प्रश्न सुटणे अशक्य आहे. त्यासाठी शासन, उद्योजगत, समाजकार्य करणारे नेतृत्व यां सर्वांनीच एकत्र येउन चिंतन करून कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. केवळ आर्थिक विकास म्हणजे जगातील श्रीमंतांच्या यादीत भारतीय उद्योजक चमकले म्हणजेच विकास झपाटयाने झाला असे म्हणने उचित ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. मधुसुदन साठे,एसईझेड चे रणकंदन ? लोकसत्ता अर्थवृतांत,मार्च २००७.

२. दिपक भामरे, विशेष आर्थिक क्षेत्र: समस्या आणि उपाय,अर्थसंवाद एप्रिल—जुन २००७.

३. अर्थसंवाद — मराठी अर्थशास्त्र परिषद,एप्रिल — जुन २००७.

४. लोकराज्य सप्टेंबर २००७.

**21**

# भारतीय अर्थव्यवस्था : रोजगार संधी

**डॉ. एन. के. मुळे**

सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
सुंदरराव सोळंके कला, वाणिज्य , विज्ञान महाविद्यालय,
माजलगांव, जिल्हा बीड

***********

आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था अशी अभिमान वाटावी अशी भारताची ओळख निर्माण झालीय. तसेच आपला देश मानव संसाधनाची मोठी खाण आहे. विकसित देशांमध्ये वृध्दांची संख्या वाढत असतांना २०२२ मध्ये जगातील सर्वाधिक तरुणांची संख्या भारतात असणार आहे. भारतातील संख्या भारतात असणार आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के लोकसंख्या तरुण असणार आहे. भारतातील तरुणांचा वर्ग बहुमूल्य असे मानव संसाधन आहे. आतापर्यंत सर्वच सरकारांचा प्राधान्यक्रम सृजनशील आणि प्रतिभावान तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देणे हाच आहे.

आधुनिक अर्थयवस्थेचे यश आणि अपयश रोजगार निर्मितीवर अवलंबून आहे. देशातील प्रत्येक हाताला काम देणे हे चांगल्या अर्थव्यवस्थेचे लक्षण आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतमध्ये विविध क्षेत्रातील रोजगार खालील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**Indian Economy**

| | Industry | (Percentage) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1983 | 1993-94 | 1999-2000 | 2004-05 |
| 1 | Agriculture | 65.42 | 61.03 | 56.64 | 52.06 |
| 2 | Mining & Quarrying | 0.66 | 0.78 | 0.67 | 0.60 |
| 3 | Manufacturing | 11.27 | 11.10 | 12.13 | 12.90 |
| 4 | Electricity, Gas & Water Supply | 0.34 | 0.41 | 0.34 | 0.35 |
| 5 | Construction | 2.56 | 3.63 | 4.44 | 5.57 |
| 6 | Trade, Hotel and Restaurant | 6.98 | 8.26 | 11.20 | 12.62 |
| 7 | Transport, Storage & Communications | 2.88 | 3.22 | 4.06 | 4.61 |
| 8 | Financial Services | 0.78 | 1.08 | 1.36 | 2.06 |
| 9 | Community, Social & Personal Services | 9.10 | 10.50 | 9.16 | 9.24 |
| | Total Employment | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 |

Source :- Government of India, Ministry of Finance, Economic Survey, २००७-२००८ Table १०.१० p. २४७

भारतात रोजगार व बेरोजगारीचे मोजमाप (Employment

Unemployment Measurement In India)

भारतात बेरोजगारीविषयक आकडयांचे तीन प्रमुख स्त्रोत आहेत:

i) दशवार्षिक जनगणनेचे अहवाल;

ii) राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेचं (NSSO) यांकडील एम्प्लॉयमेंट एक्सचेंजकडे झालेल्या नोंदणीची आकडेवारी.

iii) रोजगार व प्रशिक्षण सरसंचलनालय (DGET) यांकडील एम्प्लॉयमेंट एक्सचेंजकडे झालेल्या नोंदणीची आकडेवारी.

यापैकी NSSO चे अहवाल सर्वात महत्वाचे मानले जातात

NSS ची ६६ वी फेरी (६६ th Round of NSS)

NSSO ने जुलै २००९ ते जून २०१० दरम्यान आपली ६६ वी फेरी पूर्ण केल. ही ६६ वी फेरी ८ वी पंचवार्षिक फेरी होती. ही फेरी पुढील विषयांबाबतच्या आकडेवारीबद्दल होती.

i) घरगुती उपभोक्त खर्च, आणि

ii) रोजगार व बेरोजगारी. (यापूर्वी NSSO ने आपल्या ६१ व्या फेरी अन्वये २००४-०५ मध्ये ही आकडेवारी जमा केली होती.)

NSS च्या ६१ व्या फेरीनुसार (२००४-०५) आणि ६६ व्या फेरीनुसार (२००९-१०) देशातील श्रम शक्ती, कार्यशक्ती व बेरोजगारी व्यक्तींची संख्या (आकडे दशलक्षात) पुढीलप्रमाणे होती:

| निर्देशक | २००४-०५ | २००९-१० |
|---|---|---|
| **१) UPSS च्या आधारावर :** | | |
| श्रम शक्ती | ४६९.० | ४६८.८ |
| कार्यशक्ती | ४५७.९ | ४५९.० |
| बेरोजगार | ११.३ | ९.८ |
| बेरोजगारी दर (%) | २.३ | २.० |
| **२) CWS च्या आधारावर :** | | |
| श्रम शक्ती | ४४५.२ | ४५०.४ |
| कार्यशक्ती | ४२५.२ | ४३४.२ |
| बेरोजगार | २०.० | १६.१ |
| बेरोजगारी दर (%) | ४.४ | ३.६ |
| **३) CDS च्या आधारावर :** | | |
| श्रम शक्ती | ४१७.२ | ४२८.८ |
| कार्यशक्ती | ३८२.८ | ४००.८ |
| बेरोजगार | ३४.३ | २८.० |
| बेरोजगारी दर (%) | ८.२ | ६.६ |

२००९-१० मध्ये ग्रामीण व शहरी, तसेच पुरुष व महिलांच्या बेरोजगारीचा दर विविध आधारांवर पुढील प्रमाणे होता:

| बेरोजगारीचा दर (%) | | | | |
|---|---|---|---|---|
| निर्देशक | ग्रामीण | शहरी | पुरुष | महिला |
| UPSS | १.६ | ३.० | २.० | २.३ |
| CWS | ३.३ | ४.२ | ३.३ | ४.३ |
| CDS | ६.८ | ५.८ | ६.१ | ८.२ |

**रोजगार वृध्दीचे खाजगी अनुमान :**

आतपर्यंत रोजगार वृध्दीचे तीन अनुमान उपलब्ध आहेत. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन कंपनी या खाजगी कंपनीकडून मुंबई शेअर बाजाराच्या सहकार्याने, देशभरातले रोजगार विषयक मासिक अनुमान, जानेवारी २०१६ पासून प्रसिध्द करण्यात येत आहे. या आकडेवारीनुसार मे २०१७ ते एप्रिल २०१८ या काळात ३ दशलक्ष रोजगार घटले.

दुसरे अनुमान म्हणजे पुलक घोष (प्रोफेसर, आय आय एम, बंगलोर) आणि सौम्या घोष ( एसबीआय) यांचा जॉईंट पेपर आहे. वेतनपटाशी संबंधित घ्ट्वर्डस पे रोल रिपोर्टिंग इंन इंडियाङ या पेपरमध्ये वेतनपटावर आधारित, भारतातील रोजगार बदलाशी संबंधित भारतातले पहिले अनुमान त्यांनी प्रकाशित केले. रोजगारात वाढ झाल्याचे पाहिले अनुमान त्यांनी मार्च २०१८ मध्ये केले, अकृषक ७ दशलक्ष रोजगार निर्माण झाल्याचे अनुमान त्यांनी सांगितले. त्यांच्या नुकत्याच म्हणजे २०१८ च्या जुलै १८ मधल्या अनुमानानुसार . १८ या वित्तीय वर्षात किमान १० दशलक्ष रोजगार निर्माण झाले.

तीसरे अनुमान तीर्था दास आणि सुरजीत एस भल्ला केले असून त्यानुसार १८ या वित्तीय वर्षारत १२.८ दशलक्ष रोजगार निर्माण झाले. त्यांचे अनुमान व्यापक आकडेवारीवर आधारित आहे. (उदा. वर चर्चा केल्याप्रमाणे, बांधकाम क्षेत्रातली सकल राष्ट्रीय उत्पादन वृध्दी) , ई पी एफ ओ आकडेवारी ( १८-२१ वर्षांच्या व्यक्तींसाठी) २०१४ आणि २०१५ मधले श्रम बळ सर्वेक्षण आणि २०१६ आणि २०१७ मधली बेरोजगारी विषयी सीएमआयइची आकडेवारी.

**बेरोजगारीचा दर -**

NSSO (National Sample Survey Office) रोजगार व बेरोजगारीविषयक माहिती संकलित करुन दर ५ वर्षांनी भारतातील रोजगार बेराजगारीच्या निर्देशफलकाचा अहवाल (Key Indicators of Employment & Unemployment in India) प्रकाशित करत असते. १९७२-७३ ला NSSO ने आपल्या २७ व्या मोजणी फेरीत देशाचा असा पहिला अहवाल प्रकाशित केला NSSO ने २००४-०५ मधील ६१ व्या मोजणी फेरीत सातवा आणि २००९-१० मधील ६६ व्या मोजणी फेरीत आठवा आणि २०११-१२ मधील ६८ व्या मोजणी फेरीत ऩववाछ अहवाल प्रकाशित केला. या अहवालामध्ये वापरल्या गेलेल्या विविध संकल्पना, व्याख्या आणि

रचना या दांतवाला समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार असतात. NSSO कार्यकारी लोकसंख्या आणि बेरोजगारीत लोकसंख्येचे प्रमाण मोजते. रोजगारात लोकसंख्या मोजताना नियमित, स्वयं व नैमित्तिक (Casual) रोजगारी मोजले जाते. यात अर्धरोजगारी मोजली जात नाही. NSSO रोजगाराचे व बेरोजगाराचे आकडे ४ प्रकारांत प्रकाशित करते.

### बेरोजगारी (NSSO)

UPS-Usual Principal Status.

| आकडे [कोटी] | २००९-१० | २०११-१२ | |
|---|---|---|---|
| [illegible] | ४३.८१ | ४८.०(३६.४%) | LFPR ← |
| [illegible] | ४२.७१ | ४६.४६(३५.४%) | WPR ← |
| [illegible] | १.१ | १.२४(४%) | PU ← |
| [illegible] | २.५% | २.७% | UR ← |

USUsual Status. (ps+ss)

| आकडे [कोटी] | २००९-१० | २०११-१२ | |
|---|---|---|---|
| [illegible] | ४६.८८ | ४८.३०(३९.५%) | LFPR ← |
| [illegible] | ४५.९ | ४७.२९(३८.६%) | WPR ← |
| [illegible] | ०.९८ | १.०८(०९%) | PU ← |
| [illegible] | २.०% | २.२% | UR ← |

CWS- Current Weekly Status.

| आकडे [कोटी] | २००९-१० | २०११-१२ | |
|---|---|---|---|
| कामकरी | ४५.०४ | ४६.२० (३९.०%) | LFPR ← |
| रोजगारीत | ४३.४२ | ४४.५६ (३६.०४%) | WPR ← |
| बेरोजगारीत | १.६२ | १.७१(१.४%) | PU ← |
| बेरोजगारीचे प्रमाण | ३.६% | ३.७% | UR ← |

CDS-Current Daily Status.

| आकडे [कोटी] | २००९-१० | २०११-१२ | |
|---|---|---|---|
| कामकरी | ४२.८१ | ४४.०४(३५.९%) | LFPR ← |
| रोजगारीत | ४०.०८ | ४१.५७ (३३.९%) | WPR ← |
| बेरोजगारीत | २.८१ | २.४७(२%) | PU ← |
| बेरोजगारीचे प्रमाण | ६.६% | ५.६% | UR ← |

### रोजगार विस्तार धोरण :-

विद्यमान सरकारने रोजगाराला चालना मिळण्याच्या दिशेने काही सुधारणा हाती घेतल्या आहेत. उदा. रस्ते बांधाणीवर भर (श्रम विषयक काम), मुद्रा योजना. (लहान उध्दोजकांना कर्ज पुरवठयाची सोय) आणि नवे कामगार घेणाऱ्या मालकाला वेतन अनुदान, (भविष्य निर्वाह निधी साठी मालकाचे योगदान सरकार भरणार)

बांधकाम क्षेत्रातल्या सकल राष्ट्रीय उत्पादन वृध्दीची, वित्तीय वर्ष १८ मधल्या वाढीत मोठी भूमिका आहे. वित्तीय वर्ष २०१८ मध्ये बांधकाम क्षेत्रात सकल राष्ट्रीय उत्पादनात झालेली ५.८ टक्के वृध्दी ही गेल्या सहा वर्षातली सर्वात सर्वात मोठी वाढ आहे. वित्तीय वर्ष १८ मध्ये बांधकामाला मिळालेली गती ही गेल्या २० वर्षात मिळालेली सर्वोच्च होती. २०१८ या वित्तीय वर्षात बांधकाम क्षेत्राने १.७ ते ३ दशलक्ष रोजगार उपलब्ध केल्याचे अनुमान आहे.

### सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र रोजगार निर्मिती. :

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आपल्या देशातील औद्योगिक क्षेत्रातल्या एकूण व्यवहारांमध्ये लक्षणीय योगदान देतात आणि अधिकाधिक रोजगारनिर्मिती करण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावतात. सध्या देशभरात सातकोटीहून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आहेत. ज्यांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या उद्योगांमध्ये सुमारे बारा कोटी रोजगार निर्माणहोत आहेत. हे असे क्षेत्र आहे की जे कृषीक्षेत्राखालोखाल मोठ्या प्रमाणांवर स्वयंरोजगार आणि नोकऱ्यांच्या विस्तृत संधी निर्माण करते. त्याबरोबरच, या क्षेत्रात कामगार आणि भांडवल यांचे गुणोत्तरदेखील बरेच जास्त असलेले दिसून येते ऐतिहासिकदृष्ट्या, गेल्याकाही काळात घडून आलेल्या विकास प्रक्रियेमुळे लोकांची रुची कृषी आधारित उद्योगाकडून, उत्पादन आणि सेवा क्षेत्रासारख्या बिगर कृषी व्यवसाया कडे वळली आहे. त्यामुळे आता देशाच्या वाढीसाठी, विकासासाठी आणि रोजगार निर्मितीच्या ध्येयपूर्तीसाठी उत्पादन आणि सेवा क्षेत्र निर्णायकरित्या महत्वपूर्ण ठरत आहे. येत्या काही वर्षात, लोकसंख्येत लक्षणीय वाढ होईल आणि त्यातही काम करण्यायोग्य वर्गात अभूतपूर्व वाढ होण्याची अपेक्षा असतांना, या मोठ्या प्रमाणातल्या कामगार वर्गाला सामावून घेण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला महत्वाची भूमिका बजावावी लागेल. या क्षेत्रात रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी, मनुष्यबळरुपी भांडवलाच्या उभारणीवर लक्ष केंद्रित करणे महत्वाचे आहे. खासकरून वाहतूकीशी संबंधित उपकरणे आणि विद्युत यंत्रे, लाकूड, चामडे आणि चामडयापासून तयार होत असलेली इतर उत्पादने, कागद, कापड आणि हस्तकलेच्या वस्तु इत्यादी सारखेकाही विशिष्ट उद्योग, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कामगार वर्गाची आवश्यकता असते अशा उद्योगांसाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे हे महत्वाची गोष्ट आहे.

### कृती कार्यक्रम :

अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र अत्यंत महत्वपूर्ण आहे. कारण या क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील अन्य क्षेत्रांवर अनेक पटींनी प्रभाव पडत असतो. उत्पादन क्षेत्र अर्थव्यवस्थेमधील इतर क्षेत्रांतून उपलब्ध होणारा कच्चा माल आणि सेवा यांचा उपयोग करुन घेते आणि त्या बदल्यात त्या क्षेत्रांना तयार उत्पादने पुरवते. अशा प्रकारे हे क्षेत्र कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनापर्यंतच्या, उत्पादन साखळीमधील सर्व गोष्टींच्या मागणीला चालना देते. राष्ट्रीय उत्पादन धोरणात कल्पिल्याप्रमाणे, उत्पादन क्षेत्रामध्ये सन २०२२ पर्यंत १० कोटी लोकांना रोजगार देण्याची क्षमता आहे. तथापि, तसे करण्यासाठी, काही तातडीचे बदल घडवून आणणे अत्यावश्यक आहे.

### रोजगार वाढीला चालना देण्यासाठी काही उपयुक्त सूचना :

१) कामगार केंद्रित उद्योगांच्या वाढीला प्रोत्साहन देणे.

२) विद्यालये, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये नाविन्यपूर्ण

प्रयोगशाळा उभारुन प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे.

३) उत्कृष्ट गुणवत्तेच्या पध्दतीचा अवलंब करुन कामगारांची उत्पादकता वाढवणे.

४) योग्यवेळी कर्ज पुरवठा होत राहील हे सुनिश्चित करणे आणि.

५) तयार झालेल्या उत्पादनांना चांगली बाजारपेठ उपलब्ध करुन देणे.

आपल्या देशात काही भागात तुलनेने खूप कमी मनुष्यबळ असून काही भागात मनुष्यबळाची उपलब्धता अधिक प्रमाणात आहे. याचे कारण नियोक्ता व नोकरदार यांच्यात योग्य वेळी आवश्यकतेनुसार समन्वय साधणारा दुवा उपलब्ध नाही. नोंदणी न केलेले लेबर कॉन्ट्रॅक्टर जादा असल्यामुळेही या समस्येत भर पडते आहे. वर्तमान शासनाने या समस्येवर काही समाधान मिळवण्यासाठी राष्ट्रीय करियर सेवा संकेतस्थळ तयार केले आहे. तरिही काही प्रश्न जसे उपलब्ध माहितीच्या तुलनेत कामगार व कार्य नियुक्त मनुष्यबळ यांच्या आकडेवारीतील तफावत वाढत जात आहे. तसेच कामात सहभागी होण्याच्या दराबाबत स्त्रियांसह पुरुषांच्या संख्येतही घट होत आहे. शासकिय धोरणाप्रमाणे स्त्रियांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन बांधील आहे. तरिदेखील स्त्रियांच्या बेराजगारीच्या आकडेवारीतील वाढ हा एक गंभीर प्रश्न आहे. याचे प्रमुख कारण अत्यंत कमी वेतन हे आहे. तसेच आपल्या देशात स्वयंनिवडीनुसार रोजगारसंधी मिळत नाहीत. मिळणाऱ्या रोजगारसंधी या वैयक्तिक शिक्षण व पसंतीनुसारच मिळतील याची शाश्वती नाही. तसेच कुशल कामगारांचा अभावामुळे रोजगारसंधी असुनही त्या रिक्त राहतात.

यासाठी वर्तमान सरकारने सुरु केलेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास संस्था National Skill Development Agency (NSDA), राष्ट्रीय कौशल विकास महामंडळ National Skill Development Corporationण

(NSDC), व प्रशिक्षण महासंचालक Directorate General of Training (DGT) यांच्याद्वारे चालवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाच्या विविध उपक्रमातून स्वयंरोजगाराला प्रोत्साहन लाभून रोजगारात भरभराट दिसून येईल, अशी अपेक्षा आहे.

**लोकसंख्या भारतासाठी अनुकुल :**

डेमोग्राफीक डिव्हिडंड आणि लोकसंख्येचा उच्च दर या बाबी आता मागे पडल्या. राष्ट्रीय प्रजनन दर आता. प्रति महिला, २.१ बालक असा तर लोकसंख्या वृध्दी दर केवळा वार्षिक १.१ टक्के असा कमी झाला आहे. दोन दशकांपूर्वी हा दर १.८ होता. १५-२४ या वयोगटातल्या युवांची संख्या. येत्या पाच वर्षात २.५ दशलक्ष ने वाढण्याची अपेक्षा आहे. (२०१७ मधल्या २३६.२ दशलक्ष वरुन २०२२ मध्ये २३८.७ दशलक्ष) युवकांची व्यापक व्याख्या घेतली. (१५-३४ वर्ष) तरी येत्या पाच वर्षात, केवळ ११.७ दशलक्षची वाढ होईल. २०१२ आणि २०१७ मध्ये हा दर जवळजवळ दुप्पट होता.

शैक्षणिक नोंदणीतही मोठी वृध्दी दिसून आली. २००४-०५ आणि २०११-१२ यामधल्या काळात, शाळा अथवा महाविद्यालयात जाणाऱ्यांची संख्या ४० दशलक्षने वाढली. (१५ वर्षापेक्षा कमी वर्ष वयोगट) येत्या सहा वर्षात, शैक्षणिक नोंदणीत वाढ होऊन, २०११-१२ मधल्या १०१ दशलक्ष वरुन ती २०१७ मध्ये ११२ दशलक्ष झाली, असे अनुमान आहे.

भारतात , महिलांचा , श्रम बळ सहभाग दर कमी झाला असून त्याबाबत गैरसमज झाला आहे. जास्तीत जास्त महिला शाळा आणि महाविद्यालयात जात आत. त्यामुळे निम्मी घट दिसत आहे. दुसरे म्हणजे महिलांचा श्रम बळ दर घटत आहे त्याच दराने पुरुषांचा सहभाग दरही घसरत आहे २४ वर्षावरील महिलांचा श्रम बळ सहभाग २००९ पासून स्थिर राहिला आहे. महिलांमधल्या वाढत्या शैक्षणिक प्रमाणामुळे त्यांचा , श्रम सहभाग आणि रोजगार , भविष्यात वाढणार आहे.

**ठळक मुद्दे :**

शासन सर्वांनाच नोकऱ्या देऊ शकत नाही. तसेच प्रत्येकाने नोकरदार होणे हे देखील विकासाच्या दृष्टीने अपेक्षित नाही. आजीवन वेतनाच्या नोकऱ्या उपलब्ध करुन देऊन नियोक्ता नोकरदार अशा दोन वर्गाची विषम आकडेवारी वाढवणे विकासाला पोषक ठरत नाही. त्याऐवजी, रोजगारावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, जे अल्पकालीन आणि करारात्मक असू शकते.

सद्यस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे घडत आहेत. जसे, ग्रामीण भागांचा शहरी भागांत कायापालट. शेतीच्या क्षेत्रांत बिगरशेतीचे उद्योग, निर्वाहासाठी तात्पुरत्या रोजगारांपासून मासिक अथवा दैनिक वेतनाच्या रोजगारांच्या संधी, आजीवन नोकरीऐवजी अल्प कालीन करार तत्वावरील नोकऱ्या , नियोक्ता नोकरीदार पध्दतींच्या नोकरीऐवजी युवा पिढीचा स्वयंउद्योजकतेकडे कल इ.

व्यावसायिकता, स्वयंरोजगार व उद्योजकतेची मानसिकता उद्यमशीलता संस्कृतीतून मानसिकता उद्यमशीलता संस्कृतीतून रुजावी याच उद्देशाने शासनाने स्टर्ट अप इंडिया , स्टँड अप इंडिया तसेच मुद्रा योजना यांसारखे उपक्रम सुरु केले.

रोजगारसंधींची वाढ आणि विकासाची गती एकसमान किंवा समांतर असेलच असे नाही. विकासाची रचना ज्या स्वरुपाची आहे

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.891(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | March 2021 Issue-74, Vol-01 | 0118

न्यावर त्याचे नवनवीन उद्यम व रोजगारसंधीचे सकारात्मक निकाल अवलंबून असतात.


**संदर्भ ग्रंथ सुची :**

१. भारतातील बेरोजगारी आणि रोजगाराचा हक्कडॉ. जे. एफ. पाटील., डॉ. व्हि.बी. ककडे, प्रबोधन प्रकाशन इचल करंजी.

१. योजना मासीक. सप्टेंबर २०१८

२. Indian Economy, S.K. Misra, V. K. Puri २६th edition २००८ , Himalaya Phblishning House Mumbai.

३. भारतीय अर्थव्यवस्था, रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन पुणे

४. स्पर्धा परिक्षा अर्थशास्त्र -१ डॉ. किरण जी देसले, दिपस्तंभ प्रकाशन, जळगांव

५. Government of India , Ministry of Finance Economic Summery] २००७-२००८ , Table १०.१०, Page No. २४७

६. NSSO ६८th Survery, Empl Report, Ch ३, Page No. २७


❑❑❑

**22**

# साहित्य,समाज आणि संस्कृती यांच्यातील अनुबंधाचे दर्शन—'नाद अंतरीचा श्रीलंका व कुंपणापलीकडला देश पाकिस्तान'


डॉ.नावडकर विद्या विजय

सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, मराठी विभाग, वीर वाजेकर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे, ता.उरण, जि.रायगड (नवी मुंबई)


***********

**गोषवारा —**


प्रवासात जे प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले ते ललित लेखनरूपाने मांडणे म्हणजे प्रवासवर्णन, असे ढोबळमानाने म्हणता येईल. सर्वसामान्यपणे वर्णनाची पातळी हकीकतीची किंवा वृत्तांतकथनाची राहते. देश, काल,परिस्थिती ह्यांचे वर्णन, प्रवासातील हालअपेष्टा, मौजमजा वगैरेंच्या हकीकती वस्तुनिष्ठपणे सांगणे, असेच त्यांचे परंपरगत स्वरूप असते. अशी प्रवासवर्णने त्या त्या काळच्या परिस्थितीवर प्रकाश टाकणारी म्हणून अभ्यासाची साधने होऊ शकतात. मराठी वाङ्मयामध्ये प्रवासवर्णनांची एक प्रभावी परंपरा असलेली दिसते. ललितगद्याचा रचनाप्रकार म्हणून प्रवासवर्णनांना महत्त्वाचे स्थान असलेले दिसते.वाङ्मयीनदृष्टीने प्रवासवर्णनांना विशेष स्थान प्राप्त झालेले दिसते. ह्या प्रक्रियेत प्रवास वर्णनकाराच्या संवेदनशील व्यक्तीमत्वाला अपरिहार्य महत्त्व असते. प्रत्यक्ष प्रवासाचा काळ व प्रवास वर्णनलेखनाचा काळ ह्यांच्या दरम्यान कित्येकदा खूप कालावधी लोटलेला असतो. या वेळची प्रक्रिया वेगळ्या पातळीवरची असते. स्थळ, प्रसंग याचा अनुभव दीर्घ काळ मनात रेंगाळलेला असतो. स्मृतीरूपाने तो अनुभव आस्वादला जातो. स्थळ, प्रवासी ह्यांच्यातले दूरत्व नाहीसे होते. स्थळ कसे भावून गेले, ह्याला महत्व येते. स्थळालाही व्यक्तिमत्व असते. प्रवासवर्णनात स्वानुभवाला प्राधान्य असल्याने लेखकाच्या व्यक्तीमत्त्वानुसार निवेदनाची

ISSN-2320-4494
RNI No MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal



## SPECIAL ISSUE : V
## FEBRUARY - 2021

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | साहित्यिक गो. नी. दांडेकर यांचा जीवनप्रवास | सुप्रिया राजाराम गांवकर | 122-126 |
| 27 | मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती : जागतिकीकरणाच्या संदर्भात | प्रा.भरतकुमार भागाजी भालेराव | 127-131 |
| 28 | अमृता प्रीतम के 'पिंजर' उपन्यास में नारी चित्रण | अर्चना कडूबा पालकर | 132-134 |
| 29 | अधूरे देह की त्रासदी: किन्नर कथा | प्रा.डॉ.बाबासाहेब भुजाडे | 135-140 |
| 30 | संत तुलसीदास की प्रासंगिकता | डॉ. विष्णु गव्हाणे | 141-144 |
| 31 | ``महादेवी वर्मा और छायावाद`` | प्रा.खाडे विद्या बाबूराव | 145-147 |
| 32 | अलका सरावगी के कहानी संग्रह : दूसरी कहानी में वर्णित नारी | प्रीती अहिर | 148-152 |
| 33 | हरिवंशराय बच्चन के काव्य में प्रतीकात्मकता | डॉ.सिध्देश्वर विठ्ठल गायकवाड | 153-156 |
| 34 | संत तुकाराम का विद्रोह | डॉ. टाळके ए. बी. | 157-162 |
| 35 | सामाजिक कार्यकर्ता और समाज में अच्छा परिवर्तन करन में उसकी भूमिका | शिंदे प्रशांत हाबु | 163-167 |
| 36 | वृद्धावस्था : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. दिलीप कुमार सोनी | 168-174 |
| 37 | शितयुध्द कालखंड मे संयुक्त राष्ट्रसंघ की सफलता,असफलता एक परिक्षण | डॉ.सूर्यकांत माधवराव सांभाळकर | 175-180 |
| 38 | संत रविदास यांचे स्त्रीमुक्ती विषयी विचार | प्रा.चव्हाण आर.ए. | 181-183 |
| 39 | महात्मा बसवण्णाच्या समतेच्या लढयातील पहिले बलिदान : वीरशरण हरळय्या | प्रा.डॉ.दत्ता पिलाप्पा हिंगमिरे | 184-187 |
| 40 | मराठेकालीन जमीन महसूल पध्दती एक अभ्यास | डॉ.देवकाते बी.एन. | 188-194 |
| 41 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेचे किंवा शासनव्यवस्थेचे मूल्यमापन | प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर | 195-200 |
| 42 | सेनापती उमाबाई दाभाडे जीवन आणि कार्य | डॉ.सावंत के.डी. | 201-204 |
| 43 | कालखंडानुसार मोहोळ तालुक्याच्या इतिहासाचा | डॉ. सज्जन उध्दव पवार | 205-208 |
| 44 | आदिवासी कोकणीसमाजातील समाजसुधारक : श्री. बी. एस.कोकणी | डॉ. शशीकांत गोकुळ साबळे | 209-212 |
| 45 | "लोकराजा राजर्षी शाहू महाराजांचे लोकोध्दारक कार्य" | प्रा.डॉ.सुनिल रजपूत | 213-215 |
| 46 | प्रशासक हा तत्त्वज्ञ का असायला पाहिजे? (Why the Administrator Should be Philosopher) | चंद्रकांत प्ल्हाद सोनवणे | 216-220 |
| 47 | कृषी क्षेत्रातील राजर्षी शाहू महाराज यांचे | प्रा.डॉ.व्यंकटेश काळूराम मदनुरे | 221-223 |
| 48 | शिवकालीन ग्रामीण अर्थकारण | डॉ.मुळे नंदकिशोर कृष्णराव | 224-227 |
| 49 | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान : शेतकरी आत्महत्या | गजानन संभाजी फुपाटे | 228-233 |
| 50 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे आर्थिक विचार | प्रा.सुनिल मिरासे | 234-237 |
| 51 | कोरोना कालखंड आणि भारतीय महिलांची स्थिती | डॉ.प्रा.चांगदेव निवृत्ती मुंढे | 238-241 |
| 52 | शिवकालीन अष्टप्रधान मंडळ व प्रशासन व्यवस्था | डॉ.ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे | 242-245 |
| 53 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कृषिविषयक दृष्टिकोन एक भौगोलिक अभ्यास | प्रा.कांबळे दयानंद सखाराम | 246-249 |

# शिवकालीन ग्रामीण अर्थकारण

**डॉ.मुळे नंदकिशोर कृष्णराव**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, मजलगाव जि.बीड

**प्रस्तावना :**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य सर्वसामान्य लोकांना आपली राज्य वाटणे ही घटनाच मोठी अनोखी होती.एखाया राजघराण्यांनी निर्माण केलेले राज्य हे त्या राजाचेआहे असे मानण्याचा हा कालखंड होता. छत्रपतीशिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य हेरयतेचे राज्य आहे असा विश्वास सामान्य जनतेत निर्माण झाला होता. छत्रपतींनी स्वराज्य निर्माण करताना हिंदवी स्वराज्याची एक तात्त्विक भूमिका मांडलेली होती.विशिष्ट ध्येय धोरण यांनी प्रेरित होऊन शेतकरी, शेतमजूर व कारागीर यांना केंद्रस्थानी मानून छत्रपतींनी आपल्या स्वराज्याची नैतिक उभारणी केलेली होती.छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करत असताना ग्रामीण अर्थव्यवस्थेला केंद्रस्थानी मानून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे काम केले.छत्रपतींचे स्पष्ट मत होते की ग्रामीण अर्थव्यवस्था हीच खरी राज्याची जमेची बाजू आहे.रयतेचे कल्याणहीशिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीच्या मागील मुख्य प्रेरणा होती.लोक कल्याणकारी राज्य ही आधुनिक संकल्पना आहेपरंतु शिवाजी महाराजांनी 17 व्या शतकातही ही संकल्पना आपल्या राज्यात राबवली होती.शिवकालीन ग्रामीण अर्थकारणालात्यामुळेच महत्त्व प्राप्त झाले होते.

**संशोधन लेखाचे उद्देश :**

१. शिवकालीन ग्रामीण जीवन पद्धतीचा आढावा घेणे
२. शिवकालीन ग्रामीण अर्थकारण अभ्यासणे
३. शिवकालीन ग्रामीण महसूल व्यवस्था अभ्यासणे

वरील उद्देशाचाआढावा घेण्यासाठी शिवकालीन ग्रामीण अर्थकारण या शोध निबंधाच्यामाध्यमातून प्रयत्न केलेला आहे.रयतेचे राज्य आणि स्वराज्यया दोन्ही संकल्पनामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी जनतेचे कल्याण ,राज्याचे उत्पन्न या दोन्ही गोष्टींचा समतोल साधलेला दिसून येतो.शिवकालीन ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती याच व्यवसायावर ती अवलंबून होती.ग्रामीण जनतेचा शेती ,शेती पूरक व्यवसाय हाच प्रमुख व्यवसाय होता.

शिवकालीन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करत असताना ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आधार कोणते होते हे पाहणे गरजेचे आहे.

**शिवकालीन ग्रामीण अर्थकारणाचे आधार :**

स्वराज्याची निर्मिती करत असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रजेचे कल्याण हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून स्वराज्याची निर्मिती केलेली होती.या कालखंडात स्वराज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत जमिनीवरील महसूल हा होता.या जमिनीवरील शेतसारा पद्धतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी बदल करून शेतसारा हा शेतीचे उत्पन्न, आनेवारी,नैसर्गिक आपत्ती या बाबींचा विचार करूनशेतसारा महसुलाचा दर कमी जास्त करून शेतकऱ्यांना मदतीची भूमिका घेतलीहोती.आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना बी बियाणे घेण्यासाठी, पैसादेण्यात येई.छत्रपती शिवाजी महाराजांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या उद्देशाने खालील नियम घालून दिलेले होते.

१. प्रजेचे कल्याण हा स्वराज्याचा केंद्रबिंदू होता.इमानेइतबारे प्रत्येकाने कष्ट करावे, चोरी करू नये,सैन्याने शेतकऱ्यांच्या भाजीच्या देटासही हात लावू नये असे रास्त फर्मान छत्रपती शिवाजी महाराजांनी सोडलेले होते.

२. ग्रामीण जनतेचा मुख्य व्यवसायशेती हाच असल्याने शेतकरी वर्ग संकटात असेल त्यावेळी त्यांना बैल अवजारे रोख रक्कम दिली जात होती.

३. एखाद्या शेतकऱ्यांची महसूल देण्याची ऐपत नसेल तो कर्जबाजारी झालेला असेल तर अशा शेतकऱ्यास रोख पैसे हाती देऊनत्याचेपुनर्वसन केले जात असे.

४. एखाद्या वर्षी जर ग्रामीण भागात दुष्काळ ,अतिवृष्टी झाली तर अशा वेळीशेतकऱ्यांना शेतसारा माफ केला जात असे.

५. दुष्काळात सामान्य जनतेला पोटास खंडी दोन खंडी धान्य दिले जावे असे फर्मानछत्रपतींनी काढलेले होते.

६. छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांची सतत काळजी घेतलेली दिसून येते.आपल्या राज्यात जमीन पडीक राहणार नाही याची काळजी छत्रपतींनी घेतलेली होती.त्यामुळे सहाजिकच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात ग्रामीण अर्थकारण मजबूत होते.

७. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर ग्रामीण जीवन अवलंबून असल्याने स्वराज्यात शेतकऱ्यांच्या हिताचा विचार अपरिहार्य होता.

८. छत्रपती शिवाजी महाराज शेतकऱ्यांचे म्हणजेच कुणब्यांचेराजे होते त्यांच्या उन्नती,विकासाचा विचार हा स्वराज्याचा विचार होता.

९. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात देखील अनेक स्वयंघोषित वतनदार होते हे वतनदार जनतेचा छळ करीत असत अशा वतनदारांना छत्रपती शिवाजी महाराजांनी वठणीवर आणले.

१०. छत्रपती शिवाजी महाराजांनी ग्रामीण भागातील वतनदारी पद्धती मोडीत काढून वतनदारांचेवाडे, वतने राजांनी जप्त करून आपल्या राज्यातील वतनदारी पद्धती बंद केली.

११. ग्रामीण भागातील गरीब शेतकऱ्यांना वतनदारी व कुळाच्या जोखडातून छत्रपती शिवाजी महाराजांनी मुक्त केले.गरीब शेतकऱ्यांचा शेतसारा माफ केला दुष्काळात आपल्या राज्याची धान्य कोठारे गरीब शेतकऱ्यांसाठी खुली केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ग्रामीण भागांमध्ये निर्माण केलेल्या या अर्थकारणामुळे या कालखंडात ग्रामीण जनतेचे जीवन सुखकर झाले होते.शिवकाळातील ग्रामीण अर्थव्यवस्था अतिशय चांगल्या स्थितीत होती.छत्रपती शिवाजी महाराजांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मजबुतीकरण करण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सूत्रबद्ध धोरण निर्माण केलेले होते.छत्रपतींनी ग्रामीण अर्थव्यवस्थेचे निर्माण केलेले सूत्रबद्ध धोरण खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट होते.

**शिवकालीन ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सूत्रबद्ध धोरण :**

स्वराज्याचे धोरण म्हणून सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवून, सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करून स्वराज्य आर्थिक दृष्टीने कसे परिपूर्ण होईल या विचाराने छत्रपती शिवाजी महाराजांनीग्रामीण अर्थव्यवस्थेचे काही सूत्र निर्माण केले होते

१.छत्रपती शिवाजी महाराजांनी महसूल वसुली ची मक्तेदारी पद्धत बंद केली.

२.वतनदारी, जहागीरदारी देण्याची पद्धत बंद करूनवतनदारांनास्वराज्यात समाविष्ट करण्यात आले.

३.वतनदार व जमीनदाराचेजमीनदारीहक्क काढून घेण्यात आले.

४.शेतकऱ्यांसाठी तगाई पद्धती सुरू करण्यात आली.

५.नैसर्गिक आपत्ती,शत्रू पक्षाकडून झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असेल तर शेतकऱ्यांना महसुलातून सूट देण्याची पद्धत छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केली. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत झाली.

६.युद्धामुळे ओस पडलेल्या गावांचे पुनर्वसन करण्याची पद्धती छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केली.

७.महसूल वसुलीची पद्धती प्रत्यक्ष पीक पाण्यावर आधारित सुरू करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ग्रामीण भागात केलेले हे अर्थकारणातील बदलशिवकालीन ग्रामीण भागाच्या वैभवासाठी अत्यंत महत्त्वाचे होते. कारणछत्रपती शिवाजी महाराजांनी

स्वराज्य उभारण्याच्या अगोदर वतनदारी पद्धती असल्यानेहेवतनदार, जमीनदार सामान्य शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर लुबाडणूक करत असत. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीस आलेली होती.ग्रामीण जनतेचे हाल, अपेष्टा मोठ्या प्रमाणावर होत असत.छत्रपती शिवाजीमहाराजांनी निर्माण केलेल्या सूत्रबद्ध धोरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था शिवकाळामध्ये उत्कृष्ट असल्याचे लक्षात येते.

**निष्कर्ष :**

शिवकालीन ग्रामीण अर्थकारण हेशेतीवर अवलंबून होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य हे रयतेचे राज्य आहेअसा विश्वास जनतेत निर्माण केलाहोता.रयतेचे हित यामध्येच स्वराज्याचे हित आहे. अशी छत्रपती शिवाजी राजांची धारणा होती.शिवकालीन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने शेतकऱ्यांच्या बाबतीत छत्रपतींचे अर्थकारणउत्कृष्ट होते.ग्रामीण गरीब जनतेच्या अर्थकारणाबाबत छत्रपती विविध पैलूंची इत्थंभूत माहिती घेत असत.ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्याने सैन्यातील लोकांनी शेतकऱ्यांचे पाणी, भाकर,गवत, लाकूड फाटा, भाजीपाला याला हात लावू नये व शेतकऱ्यांना त्रास देऊ नये अशी छत्रपतींची सैन्याला सक्त ताकीद होती.

एकंदर शिवकालीन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मूळ गाभा शेती हा होता.शेती केंद्रभूत मानून राज्याचा कारभार चालत असे.स्वराज्यहेरयतेचे राज्य होते. प्रस्तुत संशोधन लेखाच्या माध्यमातून शिवकालीन ग्रामीण अर्थकारणाचे पुनर्विलोकन करून शेती व शेतकरी जगण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्यास्वराज्यातील ग्रामीण अर्थकारणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भसूची :**


1. कुलकर्णीअ.र.,अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन,पुणे, 1988
2. रानडेम.गो. मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष,अनु फाटक साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मुंबई, 1969
3. शेजवलकर त्रं.श.श्री शिवछत्रपती,मराठा मंदिर प्रकाशन,पुणे,1966.
4. पगडी सेतू माधवरावशिवचरित्र एक अभ्यास, फडके प्रकाशन, कोल्हापूर,1995
5. पिसुर्लेकर पांडुरंग,मराठ्यांच्या इतिहासाची साधने,पोर्तुगीजदसर,खंड दुसरा,1969